बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक ३४ | बुधवार, दि.२९ जुलै ते ४ ऑगस्ट २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## गोंदिया जिल्ह्यात 'हिरकणी' कक्षांना टाळे; लाखो रुपयांचा निधी पाण्यात, आर्थिक चौकशीची मागणी

**गोंदिया** :–स्तनदा माता आणि त्यांच्या नवजात बालकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या महिरकणी कक्षफ योजनेचा गोंदिया जिल्ह्यात पार बोजवारा उडाला आहे. जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या निष्काळजीपणामुळे जिल्ह्यातील ३० हिरकणी कक्षांना आजच्या घडीला कुलूप जडले असून, हे कक्ष केवळ शोभेच्या वस्तू ठरले आहेत. विशेष म्हणजे, या कक्षांच्या उभारणीत मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला जात असून, दोषी अधिकाऱ्यांची आर्थिक गुन्हे शाखेकडून (एजथ) चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

**स्तनदा मातेने लाभ घेतल्याची नोंदच नाही**

महिला व बालविकास विभागाम र्फत २०२४ मध्ये जिल्ह्यातील १२ ठिकाणी प्रत्येकी ५ लाख ६० हजार रुपये खर्च करून हिरकणी कक्ष उभारण्यात आले होते. यामध्ये आमगाव, अर्जुनी मोरगाव, देवरी, गोंदिया, गोरेगाव, सडक अर्जुनी, सालेकसा व तिरोडा पंचायत समितीसह आमगाव आणि देवरी बसस्थानक परिसराचा समावेश होता. मात्र, या कक्षांचा एकाही स्तनदा मातेने वापर केल्याची कोणतीही नोंद किंवा अहवाल संबंधित विभागाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे हे कक्ष केवळ कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांचे खिसे भरण्याचे साधन बनल्याचा आरोप होत आहे.

**नियम डावलून स्वमर्जीने कंत्राट?**

हीच पुनरावृत्ती २०२६ मधील कामांतही पाहायला मिळत आहे.




२०२६ मध्ये पुन्हा १८ नवीन हिरकणी कक्ष तयार करण्यात आले. जिल्हाधिकारी आणि जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी मंजूर केलेल्या अधिकृत यादीला बगल देत, जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांनी स्वमर्जीने नवीन यादी तयार केली आणि कंत्राटदाराशी संधान साधून हे कक्ष उभारल्याचे उघडकीस आले आहे.

**साहित्याची पाहणी न करताच निधी वर्ग**

२०२६ च्या कामांसाठी मंजूर २.२८ लाख रुपयांपैकी १.७५ लाख रुपयांचा निधी कक्षातील साहित्याची साधी तपासणी वा पाहणी न करताच कंत्राटदाराला अदा करण्यात आला. यावरून विभागात मोठा आर्थिक घोळ झाल्याचे स्पष्ट दिसत आहे.

**निलंबन आणि वसुलीची मागणी**

या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री, महिला व बालविकास मंत्री, पालकमंत्री, महिला व बालविकास आयुक्त आणि गोंदियाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याप्रकरणी जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांची आर्थिक गुन्हे शाखेकडून सखोल चौकशी करण्यात यावी, दोषी अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करून त्यांच्याकडून शासकीय निधीची वसुली करण्यात यावी, अशी जोरदार मागणी आता जोर धरत आहे.

## गोंदियात गुरुजीचे विकृत कृत्य; अल्पवयीन मुलीचा विनयभंग, संतप्त ग्रामस्थांची पोलिसांत धाव

**गोंदिया** :– विद्यार्थिनींना घडवणाऱ्या शिक्षकानेच पुन्हा एकदा गुरू–शिष्याच्या पवित्र नात्याला काळीमा फासल्याचा धक्कादायक प्रकार गोंदिया तालुक्यात उघडकीस आला आहे. गोंदिया पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या लंबाटोला (गिरोला) येथील प्राथमिक शाळेतील ५५ वर्षीय शिक्षक संजय अग्रवाल याने एका अल्पवयीन ३ विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संतापाची लाट पसरली असून, संतप्त ग्रामस्थांनी रावणवाडी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली आहे.

**यापूर्वीही डांगोरलीत नोंदवला होता गुन्हा**

संशयित आरोपी शिक्षक संजय अग्रवाल याच्या विकृत वर्तनाची ही पहिलीच वेळ नसून, यापूर्वी तालुक्यातील डांगोरली येथे



कार्यरत असतानाही त्याच्यावर अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पहिल्या घटनेनंतरही त्याच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झाली नसल्याने आणि प्रशासनाने कठोर कारवाई न केल्यानेच त्याने पुन्हा असे कृत्य धाडस दाखवल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

**रावणवाडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू**

लंबाटोला (गिरोला) येथील अल्पवयीन मुलीसोबत झालेल्या या प्रकारानंतर ग्रामस्थ आक्रमक झाले असून त्यांनी तातडीने रावणवाडी पोलीस ठाणे गाठले. या विकृत शिक्षकावर तात्काळ कठोर कलम ान्वये गुन्हा दाखल करून त्याला तत्काळ अटक करण्यात यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, पोलीस या प्रकरणी पीडित मुलगी व तिच्या पालकांचा जबाब नोंदवून पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत.

**शिक्षकावर कठोर कारवाईची मागणी**

वारंवार विनयभंगासारखे गंभीर गुन्हे दाखल होऊनही संबंधित शिक्षक सेवेत कसा? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. शिक्षण विभागाने या घटनेची गंभीर दखल घेऊन संबंधित शिक्षकाला तात्काळ सेवेतून बडतर्फ करावे, अशी मागणी लंबाटोला (गिरोला) येथील ग्रामस्थांसह पालकांकडून केली जात आहे.

## ग्रामपंचायत निवडणुका पुन्हा लांबणीवर

### ४ ऑगस्टच्या यादीला ब्रेक; राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय




**मुंबई** :– मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकीय राजवट संपून लवकरच लोकनियुक्त प्रतिनिधी येणार या आशेवर असलेल्यांच्या पदरी पुन्हा एकदा निराश आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने ४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीला ऐनवेळी स्थगिती दिल्याने आगामी ग्रामपंचायत निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. राज्यात सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) मोहिममुळे आयोगाने हा निर्णय घेतला असून, ऑगस्टच्या पहिल्या पंधरवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याच्या शक्यतांवर आता पाणी फिरले आहे.

यापूर्वीच्या नियोजित वेळापत्रकानुसार ४ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होऊन लगेचच निवडणुकीचे बिगुल वाजणार होते. या पार्श्वभूमीवर गावागावांत इच्छुक उमेदवारांनी बैठका, कॉर्नर सभा, मतदार संपर्क आणि पॅनेल बांधणीच्या हालचाली तीव्र केल्या होत्या. मात्र, मतदार याद्या दोषमुक्त आणि पारदर्शक करण्यासाठी सध्या राबवण्यात येत असलेली ङ्गएसआयआरफ मोहीम पूर्ण झाल्यानंतरच अद्ययावत विधानसभा मतदारसंघ निहाय यादी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी वापरली जावी, अशी विनंती निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती.

आयोगाने ४ ऑगस्टच्या प्रसिद्धीला दिलेल्या स्थगितीमुळे सुमारे ७५४ ग्रामपंचायतींसह राज्यातील मुदत संपलेल्या सर्वच ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया काही काळासाठी पुढे ढकलली गेली आहे. मात्र, या निर्णयामुळे मतदार यादीतील मयत, दुबार, स्थलांतरित आणि बोगस मतदारांची नावे वगळून पूर्णपणे अद्ययावत व पारदर्शक यादी हाती येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे ग्रामीण भागातील राजकीय गणिते आणि मतांची जुळवाजुळव पूर्णपणे बदलणार आहे.

**नव्या वेळापत्रकाची प्रतीक्षा**

अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर उमेदवारी अर्ज स्वीकारणे, छाननी, चिन्ह वाटप आणि प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया पार पडणार होती. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी विकासकामांच्या भूमिपूजनांचा धडाका सुरू असतानाच आता या निर्णयामुळे स्थानिक पातळीवरील राजकीय वातावरण पुन्हा ङ्गवेट अँड वॉचफ मोडवर गेले आहे. अतिवृष्टी आणि सणासुदीच्या काळासोबतच आता ङ्गएसआयआरफ मोहिमेची भर पडल्याने, नवीन अद्ययावत मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच राज्य निवडणूक आयोग निवडणुकांचे नवे वेळापत्रक जाहीर करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## धान खरेदीची मर्यादा वाढवा; आमदार राजकुमार बडोले यांची अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे मागणी

**मुंबई** :–अर्जुनी–मोरगाव विधानसभा मतदारसंघातील धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आदिवासी विकास महामंडळामार्फत होणाऱ्या धान खरेदीची मर्यादा तत्काळ वाढवण्यात यावी, अशी आग्रही मागणी माजी मंत्री तथा स्थानिक आमदार राजकुमार बडोले यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुंबईत राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे सविस्तर निवेदन सुपूर्द केले.

**मर्यादेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान**

आमदार बडोले यांनी निवेदनात नमूद केले आहे की, अर्जुनी–मोरगाव मतदारसंघातील बहुतांश आदिवासी शेतकरी आपले धान पिकाचे उत्पादन




आदिवासी विकास महामंडळाच्या खरेदी केंद्रांवर विकतात. मात्र, सध्या प्रशासनाकडून धान खरेदीसाठी निश्चित करण्यात आलेली मर्यादा अत्यंत तोकडी आहे. या मर्यादेमुळे अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या संपूर्ण धान पिकाची शासकीय केंद्रावर विक्री करता येत नाही. परिणामी, उर्वरित धान व्यापाऱ्यांना कमी दराने विकावे लागत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

**एकही पात्र शेतकरी वंचित राहू नये**

धान उत्पादक आदिवासी शेतकऱ्यांचे हे आर्थिक नुकसान थांबवण्यासाठी शासनाने धान खरेदीची ही मर्यादा तातडीने वाढवणे गरजेचे आहे. खरेदी प्रक्रियेत कोणत्याही पात्र शेतकऱ्याला या मर्यादेचा फटका बसू नये आणि तो विक्रीपासून वंचित राहू नये, यासाठी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित विभागाला द्यावेत, अशी विनंतीही आमदार बडोले यांनी पत्राद्वारे केली.

**हमीभाव मिळवून देण्यासाठी सकारात्मक निर्णयाची अपेक्षा**

भेटीदरम्यान आमदार बडोले यांनी छगन भुजबळ यांच्यासमोर मतदारसंघातील धान उत्पादकांच्या इतरही अनेक समस्या मांडल्या. शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाच्या पिकाला योग्य शासकीय हमीभाव मिळावा, यासाठी राज्य सरकारने या मागणीवर तातडीने आणि सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

## कुडव्यात 'लाइट'वरून राजकारण पेटले; हक्काचे पोल इतर वॉर्डांत लावल्याने सदस्याचा तडकाफडकी राजीनामा



**गोंदिया** :–अहोरात्र मेहनत करून आणि पाठपुरावा करून स्वतःच्या वॉर्डासाठी मंजूर आणलेले पथदिवे (स्ट्रीट लाइट्स) आणि खांब इतर वॉर्डांत पळवले जात असल्याचा गंभीर आरोप करत गोंदिया तालुक्यातील कुडवा ग्रामपंचायतीचे सदस्य दिलीप देवीलाल गौतम यांनी आपल्या सदस्यत्वाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. सरपंच आणि सचिवांच्या या मनमानी कारभाराचा तीव्र निषेध नोंदवत त्यांनी हा निर्णय घेतला असून, या प्रकरणामुळे स्थानिक राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे.

**अथक प्रयत्नांनंतर मिळाली होती मंजुरी**

कुडवा ग्रामपंचायतीच्या वॉर्ड क्रमांक १ मध्ये वाढत्या चोऱ्या आणि अनुचित प्रकार रोखण्यासाठी पथदिव्यांची अत्यंत गरज होती. यासाठी सदस्य दिलीप गौतम यांनी स्वतः पुढाकार घेत संपूर्ण वॉर्डाचा सर्व्हे करून नकाशा तयार केला होता. २० नोव्हेंबर २०२३ च्या ग्राम पंचायत सभेत ठराव मंजूर करून घेतल्यानंतर, ७ मे २०२४ रोजी पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठवण्यात आला. सततच्या पाठपुराव्यानंतर जिल्हा परिषदेच्या मंजूर यादीत वॉर्ड क्र. १ साठी तब्बल २७५ खांब आणि ३६५ दिव्यांचा प्रस्ताव मंजूर झाले होते.

**मंजूर नकाशा बाजूला सारून मनमानी**

मात्र, एवढी मेहनत करूनही ऐनवेळी मंजूर नकाशा डावलून वॉर्ड क्र. १ ऐवजी हे खांब आणि दिवे इतर वॉर्डांत बसवण्याचा सपाटा सरपंच आणि सचिवांनी सुरू केला आहे. इतकेच नव्हे तर, वॉर्ड क्र. १ अंतर्गत येणाऱ्या शिव मोक्षधामासाठी मंजुरी आणूनही तेथे इलेक्ट्रिक खांब न लावता, मंजुरी नसलेल्या भलत्याच ठिकाणी खांब लावून प्रशासकीय मनमानी केली जात असल्याचा आरोप गौतम यांनी केला आहे.

**जनतेला काय उत्तर द्यायचे? सदस्य आक्रमक**

"इतर कोणत्याही वॉर्ड सदस्याने असा प्रस्ताव दिला नव्हता. आम्ही पाठपुरावा करून निधी व मंजुरी आणली. मात्र, आता हक्काचे खांब दुसऱ्या वॉर्डांत लावले जात असल्याने मला माझ्या वॉर्डातील जनतेला तोंड देणे कठीण झाले आहे," अशी उद्विग्न भावना ग्रामपंचायत सदस्य दिलीप गौतम यांनी व्यक्त केली.

सरपंच आणि सचिवांच्या या दुटप्पी धोरणाचा निषेध म्हणून त्यांनी राजीनामा अस्त्र उपसले असून, सरपंच राजीनामा स्वीकारण्यास टाळाटाळ करत असल्याने त्यांनी आता वरिष्ठ पातळीवर दाद मागण्याची तयारी दर्शवली आहे.

## दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईच्या निषेधार्थ निवेदन शिक्षण बचाव समन्वय समितीतर्फे उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत सादर

**गोंदिया** :– दिल्ली येथे शिक्षण व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईच्या निषेधार्थ शिक्षण बचाव समन्वय समिती, जिल्हा गोंदिया यांच्या वतीने भारताच्या महामहिम राष्ट्रपती महोदया यांच्या नावे मा. उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदन नायब तहसीलदार नितील चौरे यांनी स्विकारले.

निवेदनात शांततापूर्ण आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस कारवाईची निष्पक्ष व स्वतंत्र न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, चौकशीत अतिरेकी बलप्रयोग झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तसेच शिक्षण व विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर आंदोलन करणाऱ्या प्रतिनिधींशी केंद्र शासनाने तात्काळ संवाद साधून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी



करण्यात आली.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले की, भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा व आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार प्रदान करते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांवर बलप्रयोग करण्याऐवजी संवाद आणि संवेदनशीलतेच्या माध्यमातून प्रश्न सोडविणे ही लोकशाहीची खरी भावना आहे. तसेच आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांसाठी अन्न, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा, बस–रेल्वे प्रवास तसेच इतर आवश्यक मदत व सुविधा सुरळीत उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली.

यावेळी समन्वयक अतुल सतदेवे यांच्यासह वसंत गवळी, सी. पी. बिसेन, मनोज मेंढे, आदेश कुमार, मनोहर भावे, ए. डी. बोरकर, सुनील भोंगाडे, कैलाश भेलावे, दिलीप ब्राह्मणकर, जे. पी. गजभिये, रवी भांडारकर, रोहित सतदेवे आदींसह अनेक सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या लोकशाही हक्कांचे संरक्षण, शिक्षणाशी संबंधित प्रश्नांवर तातडीने संवाद सुरू करणे आणि शांततापूर्ण आंदोलनांचा सन्मान राखणे, अशी मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली.

## जिल्ह्यात८,७२३ शेतकऱ्यांची ई–केवायसी पूर्ण

**गोंदिया**:– राज्य शासनाच्या ङ्गपुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ङ्ग अंतर्गत गोंदिया जिल्ह्यात कामकाजाला गती मिळत असून विविध टप्प्यांवर लक्षणीय प्रगती झाल्याचे दिसून येत आहे. सोमवारपर्यंत ८७२३ शेतकऱ्यांची ई–केवायसी पूर्ण झाली आहे.जिल्हा स्तरावरील डॅशबोर्डनुसार आतापर्यंत एकूण २०,९१५ कर्जखाते अपलोड करण्यात आली आहेत. त्यापैकी १८८३० शेतकरी पात्र ठरले असून, त्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे.

## मंडल यात्रेचे ७ ऑगस्टला गोंदिया जिल्ह्यात आगमन; विविध ठिकाणी स्वागत



### तिरोडा तालुक्यातील नवेगाव येथे यात्रेचे स्वागत होणार

**सकाळी १०.०० वा.: तिरोडा मार्गे एकोडी येथे पहिली कॉर्नर सभा.**
**सकाळी ११.०० वा.: गोंदिया आगमन व महापुरुषांच्या प्रतिमांना माल्यार्पण**
**सकाळी ११.३० वा.: गोरेगाव ठाणा चौक येथे कॉर्नर सभा**
**दुपारी १२.०० वा.: आमगाव तालुक्यातील ठाणा येथे यात्रेचे स्वागत**
**दुपारी १२.३० वा.: आमगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात कॉर्नर सभा**
**दुपारी १.०० ते २.०० वा.: साखरीटोला डोंगरगाव सावली (१.३० वा.)**
**दुपारी २.०० वा. देवरी येथे भव्य स्वागत.**
**दुपारी २.३० वा.: कोहमारा / सडक अर्जुनी येथे कॉर्नर सभा.**
**या सर्व कार्यक्रमानंतर ही मंडल यात्रा अर्जुनी मोरगाव मार्गे लाखांदूरकडे (जि. भंडारा) रवाना होईल, असे नियोजन बैठकीत ठरवण्यात आले.**

**गोंदिया**:–सकल ओबीसी महामोर्चा व समविचारी सर्व ओबीसी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने येत्या ३ ऑगस्ट रोजी भंडारा येथून निघणाऱ्या ऐतिहासिक ममंडल यात्रेफच्या गोंदिया जिल्ह्यातील आगमनानिमित्त रविवारी (२६ जुलै) शासकीय विश्रामगृह येथे तातडीची नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत ७ ऑगस्ट रोजी यात्रेचे जिल्ह्यात भव्य स्वागत करण्यासह ठिकठिकाणी कॉर्नर सभांचे आयोजन करण्याचा निर्णय एकमुखाने घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी सकल ओबीसी महामोर्चाचे संयोजक उमेश कोराम होते.

३ ऑगस्टला भंडारा येथून सुरू होणारी ही मंडल यात्रा ७ ऑगस्ट रोजी गोंदिया जिल्ह्यात प्रवेश करेल. या यात्रेच्या माध्यमातून ओबीसींच्या हक्क आणि प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यात येणार आहे. गोंदिया जिल्ह्यातील स्वागतासाठी व विविध कार्यक्रमांसाठी खालीलप्रमाणे रूपरेषा निश्चित करण्यात आली आहे:

ओबीसींच्या हक्क आणि मागण्यांसाठी आयोजित या बैठकीला विविध ओबीसी बहुजन संघटनांचे प्रमुख प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये ओबीसी सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष सावन कटरे, ओबीसी महासभेचे अध्यक्ष इंजि. राजीव ठकरेले, ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे, ओबीसी सेवा संघाचे भूमेश शेंडे, शिक्षण बचाव समितीचे सी. पी. बिसेन, वसंत गवळी, डॉ. भूमेश ठाकरे (गोरेगाव), शिव नागपूरे (राणी अवंतीबाई लोधी संघटना), रमेश लांजेवार (सडक अर्जुनी), प्रेमलाल साठवणे (भारतीय शोषित पीडित संघटना), सुनील भोंगाडे (युवा बहुजन मंच), रवी भांडारकर, गौरव बिसेन (ओबीसी विद्यार्थी संघटना), निखिल बनसोड, बाळू वंजारी, विनीत गजभिये, आकाश वैद्य, सुधाकर मोठालकर, अमित घरवाले, कमल हटवार, संतोष खोब्रागडे आणि एस. यू. वंजारी यांच्यासह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## "एम्स' नागपूरचा दिलासादायक उपक्रम: ८ वर्षांच्या चिमुकलीवर दमा अनब ॲलर्जीवर यशस्वी उपचार; पालकांना मिळाले मोफत मार्गदर्शन

**नागपूर**:– दारिद्र्य आणि उपचाराचा मोठा खर्च यांमुळे ग्रामीण व रोजंदारीवर काम करणाऱ्या कुटुंबांना अनेकदा गंभीर आजारांकडे दुर्लक्ष करावे लागते. मात्र, नागपूर येथील 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस' (एम्स) मधील पेडियाट्रिक एनसीडी (NCD) क्लिनिक सर्वसामान्य आणि गरीब कुटुंबांसाठी संजीवनी ठरत आहे. दमा (Asthma) आणि ॲलर्जिक रायनायटिस (Allergic Rhinitis) यांसारख्या आजाराने त्रस्त असलेल्या गौरी (नाव बदललेले) या ८ वर्षांच्या चिमुकलीवर "एम्स'मध्ये यशस्वी उपचार करण्यात आले असून, तिला या त्रासातून मोठा दिलासा मिळाला आहे.

वारंवार होणारा खोकला, सर्दी; एम्समध्ये अचूक निदान गौरीला लहानपणापासूनच वारंवार तीव्र खोकला आणि सर्दीचा त्रास होत होता. रोजंदारीवर पोट भरणाऱ्या तिच्या पालकांनी सुरुवातीला याकडे सामान्य आजार म्हणून पाहिले आणि स्थानिक पातळीवर उपचार घेतले. मात्र, काहीही फरक न पडल्याने अखेर त्यांनी "एम्स'नागपूर गाठले.



तेथील तज्ज्ञ डॉक्टरांनी सखोल तपासणी करून तिला "दमा' आणि "ॲलर्जिक रायनायटिस' असल्याचे निदान केले. त्यानंतर पुढील उपचारांसाठी तिला बालरोग एनसीडी क्लिनिकमध्ये पाठवण्यात आले.

**डॉ. अभिषेक मधुरा यांच्या मार्गदर्शनात सर्वसमावेशक उपचार**

बालरोग तज्ज्ञ डॉ. अभिषेक मधुरा आणि त्यांच्या वैद्यकीय पथकाने गौरीवर विशेष लक्ष केंद्रित करून उपचार सुरू केले. रोजंदारीवर काम करणाऱ्या तिच्या पालकांची आर्थिक स्थिती विचारात घेऊन त्यांना खालीलप्रमाणे परिपूर्ण वैद्यकीय सेवा व मार्गदर्शन पुरवण्यात आले:

योग्य औषधोपचार व इन्हेलर तंत्र: चिमुकलीला योग्य औषधे देण्यासोबतच 'इन्हेलर' वापरण्याचे अचूक प्रात्यक्षिक पालकांना आणि तिला शिकवण्यात आले.

आजाराची लक्षणे व ट्रिगर ओळखणे: दम्याचा त्रास कशामुळे वाढू शकतो (धूळ, हवामानातील बदल इत्यादी) आणि या घटकांपासून बालकाचा बचाव कसा करावा, याचे सविस्तर समुपदेशन करण्यात आले.

नियमित पाठपुरावा (Follow up): आजारावर पूर्ण नियंत्रण मिळवण्यासाठी आणि उपचारांमधील प्रगती तपासण्यासाठी नियमित फॉलो–अप निश्चित करण्यात आले.

**बालकीच्या आरोग्यात सुधारणा, पालकांचा विश्वास वाढला**

"एम्स'च्या डॉक्टरांनी दिलेल्या व्यक्तिगत लक्ष आणि मार्गदर्शनामुळे आता गौरीच्या आरोग्यात मोठी सुधारणा झाली आहे. तिच्या आजाराची लक्षणे पूर्णपणे नियंत्रणात आली असून तिचे जीवनमान सुधारले आहे. या आजाराचे घरीच व्यवस्थापन कसे करावे, याबाबत आता पालकही आत्मविश्वासी झाले असून त्यांनी "एम्स'नागपूरच्या डॉक्टरांचे आणि कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## संपादकीय

# विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार कोण करणार?

एखाद्या शाळेची इमारत बंद झाली, तर त्याची बातमी वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर झळकते. गावात चर्चा रंगते. पालक चिंतेत पडतात. लोकप्रतिनिधी निवेदने देतात. आंदोलने होतात. पण एखाद्या शाळेत गणित, विज्ञान किंवा इंग्रजीचा शिक्षक नसल्यामुळे संपूर्ण वर्षभर विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहते, त्यांची स्वप्ने मावळतात, स्पर्धेतील त्यांची पावले मागे पडतात, याची बातमी मात्र कुठेच दिसत नाही. हीच आजच्या शिक्षण व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका आहे.आपल्या राज्यातील शाळांमधील उपलब्ध माहितीनुसार पाचवी ते दहावीपर्यंतच्या वर्गांसाठी जवळपास हजारो शिक्षकांची पदे रिक्त आहेत. विशेषतः गणित, विज्ञान आणि इंग्रजीसारख्या मूलभूत विषयांमध्ये शिक्षकांचा गंभीर तुटवडा आहे. या विषयांमध्ये विद्यार्थ्यांचा मजबूत पाया घातला गेला नाही, तर पुढील उच्च शिक्षणात त्यांना मोठी किंमत मोजावी लागते. हे नुकसान केवळ एका वर्षापुरते मर्यादित राहत नाही; ते त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर परिणाम करणारे ठरते.आज आपण पटसंख्या कमी झाल्यामुळे बंद होणाऱ्या शाळांबद्दल भावनिक चर्चा करीत आहोत. त्या चर्चेची गरज नक्कीच आहे. कारण प्रत्येक शाळा म्हणजे त्या गावाच्या इतिहासाचा, संस्कृतीचा आणि सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य भाग असतो. त्या इमारतींनी अनेक पिढ्या घडविलेल्या असतात. असंख्य विद्यार्थ्यांची स्वप्ने त्या भिंतींनी पाहिलेली असतात. त्या आठवणींचे महत्त्व कोणीही नाकारू शकत नाही; परंतु या वास्तवाची दुसरी बाजू आपण तेवढ्याच प्रामाणिकपणे पाहण्यास तयार आहोत का?

शाळा बंद झाली म्हणजे शिक्षण बंद होत नाही. त्या शाळेतील विद्यार्थी दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतात. शिक्षकांचेही समायोजन केले जाते. म्हणजेच शिक्षणाचा प्रवाह सुरूच राहतो. बंद होते ती फक्त एक इमारत. होय, त्या इमारतीशी असलेली भावनिक नाळ तुटते; पण विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत नाही. मात्र रिक्त शिक्षकपदांची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. इथे इमारत उभी असते. वर्ग भरलेले असतात. विद्यार्थी उपस्थित असतात. पालकांच्या अपेक्षा जिवंत असतात. पण शिकविण्यासाठी विषय शिक्षकच नसतो. वर्गात फळा असतो, बाके असतात, पुस्तके असतात, गणवेशातील विद्यार्थी असतात फक्त शिक्षक नसतो. ही परिस्थिती किती वेदनादायक आहे, याचा विचार आपण कधी केला आहे का? विद्यार्थ्यांना गणित शिकविणारा शिक्षक नाही. विज्ञानातील प्रयोग समजावून सांगणारा शिक्षक नाही. इंग्रजीची भीती दूर करणारा शिक्षक नाही. मग त्या विद्यार्थ्यांचे भविष्य कोण घडवणार? शिक्षक नसलेल्या वर्गातील प्रत्येक दिवस म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील कायमचा गमावलेला दिवस असतो. हा दिवस पुन्हा कधीच परत येत नाही.

आज ग्रामीण भागातील अनेक पालक मोठ्या त्यागाने आपल्या मुलांना शिकवत आहेत. शेतीचे उत्पन्न कमी असले, आर्थिक परिस्थिती बेताची असली तरी ते आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून प्रयत्न करतात. पण शाळेत विषय शिक्षकच नसेल, तर त्या पालकांच्या आशा कोण पूर्ण करणार? शासनाने पटसंख्येच्या निकषांवर काही शाळांचे समायोजन करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामागे आर्थिक, प्रशासकीय आणि व्यवस्थापनाचे काही तर्क असू शकतात. त्यावर स्वतंत्र चर्चा होऊ शकते; परंतु त्याच वेळी ज्या शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत, त्या विद्यार्थ्यांच्या न्यायाचा प्रश्न अधिक गंभीर आहे.

एका बाजूला आपण रिकाम्या इमारती वाचविण्यासाठी झटत आहोत; तर दुसऱ्या बाजूला शिक्षकांशिवाय चालणारे वर्ग मात्र आपल्या संवेदनांपासून दूर राहिले आहेत. हा विरोधाभास आपल्याला अस्वस्थ करणारा नाही का? गावोगावी उभारलेल्या शाळा या केवळ विटा आणि सिमेंटच्या रचना नाहीत. त्या समाजाच्या स्वप्नांचे स्मारक आहेत. त्या इमारतींमध्ये हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडले आहे. जर त्या इमारतींमध्ये विद्यार्थी कमी झाले असतील, तर त्या इमारती समाजोपयोगी कामांसाठी वापरण्याचे पर्याय नक्कीच शोधता येतील. कौशल्य विकास केंद्र, वाचनालय, प्रशिक्षण केंद्र, डिजिटल शिक्षण केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र अशा अनेक उपयुक्त कामांसाठी त्या वापरता येऊ शकतात; परंतु विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने मात्र कोणत्याही परिस्थितीत बंद पडू देता कामा नयेत.

आजची खरी गरज म्हणजे रिक्त पदांवर तातडीने समायोजन करणे. ज्या शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक आहेत, तेथे योग्य नियोजन करून गरजू शाळांमध्ये त्यांची नियुक्ती करणे. यासाठी संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षण विभाग आणि शासन यांनी एकत्र येऊन संवेदनशीलतेने निर्णय घेण्याची गरज आहे. हा प्रश्न कोणाच्या प्रतिष्ठेचा नाही. हा प्रश्न कोणाच्या अधिकाराचा नाही. हा प्रश्न कोणाच्या विजय-पराजयाचा नाही. हा प्रश्न फक्त आणि फक्त विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आहे. आज आपण घेतलेला प्रत्येक निर्णय पुढील अनेक वर्षांच्या पिढ्यांवर परिणाम करणार आहे. म्हणूनच रिक्त आणि अतिरिक्त या शब्दांमध्ये संघर्ष शोधण्याऐवजी त्यातून उपाय शोधणे अधिक आवश्यक आहे.

अतिरिक्त असलेली मनुष्यबळाची क्षमता जिथे गरज आहे तिथे पोहोचली, तर अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळू शकते. सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांना मनापासून एकच विनंती आहे. या विषयाकडे केवळ प्रशासकीय दृष्टिकोनातून पाहू नका. प्रत्येक रिक्त पदामागे शेकडो विद्यार्थ्यांची स्वप्ने उभी आहेत. प्रत्येक न भरलेल्या जागेमुळे एखादा विद्यार्थी डॉक्टर, अभियंता, वैज्ञानिक, शिक्षक किंवा अधिकारी होण्याची संधी गमावत असू शकतो. शाळा बंद होण्याची वेदना नक्कीच मोठी आहे; पण शिक्षक नसलेल्या शाळेत विद्यार्थ्यांचे भविष्य हळूहळू बंद होत जाते, ही वेदना त्याहूनही मोठी आहे. आज निर्णय इमारतींचा नाहीः. आज निर्णय विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आहे आणि भविष्याला कुलूप लागण्यापूर्वी आपण सर्वांनी एकत्र येऊन त्याचे दार उघडणे, हीच काळाची सर्वात मोठी गरज आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त

अण्णा भाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते.साठे एका मांग (दलित) समाजामध्ये जन्मलेले व्यक्ती होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादाचा प्रभाव होता पण नंतर ते आंबेडकरवादी झाले.

जन्म नाव -तुकाराम भाऊराव साठे

टोपणनाव -अण्णा भाऊ साठे

जन्म - ऑगस्ट १, इ.स. १९२०


वाटेगाव, तालुका वाळवा, सांगली जिल्हा

मृत्यू - जुलै १८, इ.स. १९६९

अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण ठरलेला आहे. अजरामर अशा या साहित्याने उपेक्षितांच्या अंतरंगाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला. उपजत बुद्धिवादी म्हणून त्यांच्या साहित्याचा धांडोळा घेता येतो. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ लोकमानसात रुजविण्याचे महत्त्वपूर्ण काम शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर द.न. गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र यांच्यासह सीमा प्रदेशातील विविध भागांतील हजारो ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले. त्याच्यामुळे लोक प्रेरित झाले.

**वैयक्तिक जीवन** - अण्णा भाऊ साठेंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव भाऊराव साठे व आईचे नाव वालुबाई साठे होते. साठे हे शाळेत शिकलेले नाही, केवळ दीड दिवस ते शाळेत गेले नंतर तेथील सवर्णांद्वारे होणाऱ्या भेदभावामुळे त्यांनी शाळा सोडून दिली. त्यांनी दोन लग्न केलीत, त्यांची पहिली पत्नी कोंडाबाई साठे तर दुसरी जयवंता साठे ह्या होत. त्यांना एकूण तीन अपत्ये होती - मधुकर, शांता आणि शकुंतला.

**राजकारण** - साठे पहिल्यांदा कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित झाले. १९४४ मध्ये दत्ता गवाणकर आणि अमर शेख या शाहिरांच्या सोबत त्यांनी लालबावटा कला पथक स्थापन केले. याद्वारे त्यांनी अनेक सरकारी निर्णयांना आव्हान दिले होते. ते १९४० च्या दशकामध्ये कार्यरत राहिले आणि तेविया अब्राम्स यांच्यानुसार, भारतातील साम्यवादाच्या आधी स्वातंत्र्याच्या नंतरची "१९५० च्या दशकातील सर्वात रोमांचक नाटकीय घटना" होती. भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्या मोर्च्यातील घोषणा होती, "ये आझादी झूठी है, देश कि जनता भूखी है!" इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशनमध्येही ते एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व होते, जी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची एक सांस्कृतिक शाखा होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये, ज्याने भाषिक विभागातून वेगळे मराठीभाषी राज्य (बॉम्बे राज्य) निर्माण करण्याची मागणी केली होती.



साठे नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकींना अनुसरत दलित कार्याकडे वळले आणि दलित व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला. इ.स. १९५८ मध्ये, बॉम्बेमध्ये स्थापन केलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात आपल्या उद्घाटन भाषणात त्यांनी म्हटले की, "पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे" यातून त्यांनी जागतिक संरचनांमध्ये दलित आणि कामगार वर्गांचे महत्त्व स्पष्ट केले. या काळातील बहुतांश दलित लेखकांच्या विपरित, साठेंचे कार्य बौद्ध धर्माऐवजी मार्क्सवादाच्या प्रभावाखाली होते.

त्यांनी म्हटले आहे की, दलित लेखकांना सध्याच्या सांसारिक व हिंदू अत्याचारांपासून दलितांना मुक्त करणे आणि त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कारण दीर्घकालीन पारंपरिक श्रद्धांना त्वरित नष्ट केले जाऊ शकत नाही.

**अन्नाभाऊ साठे यांच्या नावे असलेल्या आस्थापना**

**अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.)

**लेखन साहित्य**

साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये फकिरा (१९५९) समाविष्ट आहे, जिला इ.स. १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. साठेंच्या लघु कथांचा संग्रह १५ आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने बऱ्याच भारतीय भाषांमध्ये आणि २७ अ-भारतीय भाषांमध्ये भाषांतरित केल्या गेल्या आहेत. कादंबरी आणि लघुकथा यांच्याव्यतिरिक्त साठे यांनी नाटक, रशियातील भ्रमंती, १२ पटकथा आणि मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी लिहिली.

साठेंच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या फकिरामध्ये, साठेंनी आपल्या समुदायाला पूर्ण भुखमरीपासून वाचवण्यासाठी ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरुद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले.

नायक आणि त्याच्या समुदायाला नंतर ब्रिटिश अधिकारी द्वारे अटक आणि छळ दिला जातो, आणि अखेरीस फकिराला फाशी देऊन ठार मारले जाते.

मुंबई मधील शहरी पर्यावरणाने त्यांच्या लिखाणावर लक्षणीय प्रभाव टाकला. त्यांनी तो डायस्टोपियन परिवाराच्या रूपात दाखवला.. त्यांनी त्यांच्या "मुंबईची लावणी" आणि "मुंबईचा गिरणीकामगार" या दोन गाण्यांतून मुंबईला ङ्गदुर्व्यवहारी, शोषणकारी, असमान और अन्यायपूर्णफ असे म्हटले आहे..

**संपादन: प्रा डॉ गौतम गायकवाड,**
शासकीय अध्यापक महाविद्यालय. आय ए एस इ,
औरंगाबाद

# एम.जी. पॅरामेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांना डी.एम.एल.टी. परीक्षेमध्ये घवघवीत यश

**गोंदियाः**- महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण मंडळ, मुंबई अंतर्गत घेण्यात येणाढ्या डी.एम.एल.टी. या दोन वर्षीय अभ्यासक्रमाच्या परिक्षेचा निकाल लागला असुन या मध्ये एम.जी. पॅरामेडिकल कॉलेज मुर्री चौकी, गोंदियाच्या १००% निकाल लागलेला आहे. . एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या परिक्षेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांपैकी कु. तृप्ती सहारे या विद्यार्थीनिने ९०.४४% गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावीला आहे.



त्याच्यां पाठोपाठ कु. नंदिनी खोटेले ८४.६७%, कु. सुजाता भेंडेकर ८२.५६%, कु. स्मिता हत्तिमारे ८०.८९%, कु. हर्षदा भोयर ८०.११%, गुण घेऊन यश संपादन केलेला आहे.जिल्ह्यात पॅरामेडिकल क्षेत्रात अग्रणी असलेल्या एम.जी. पॅरामेडिकल कॉलेजला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण मंडळ, मुंबईची मान्यता असुन दरवर्षी अनेक विद्यार्थी शासकीय नौकरीसाठी निवडले जातात.

विद्यार्थ्यांनी आपले यशाचे श्रेय कॉलेजचे संचालक अनील गोंडाणे व पालकांना दिले आहे. या यशासाठी प्राचार्य अनुसया लिल्हारे, प्रा. रामेश्वरी पटले प्रा. छाया राणा, प्रा. आरती राऊत, प्रा. मनीष चौधरी, प्रा. प्रज्ञा गावंडे, प्रा. आकाश श्रोते, राजु रहांगडाले, राजाभाऊ उंदिरवाडे, प्रितम साठवने, श्रीमती योगेश्वरी ठवरे, व श्रीमती रूपाली धमगाये यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### भरधाव कार पुलावरून नहरात कोसळली; वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू, तिघे गंभीर जखमी

**गोंदियाः**- देवरी-आमगाव मार्गावरील हरदोली शेतशिवारात सोमवारी (दि. २७) पहाटे सुमारे १ वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण कार अपघातात एका वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर तिघेजण गंभीर जखमी झाले. भरधाव कारचा ताबा सुटून ती पुलावरून थेट नहरात कोसळल्याने हा भीषण अपघात घडला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, नागपूर येथून साखरीटोला येथे जात असताना कार क्र. एम एच ३५ ए जे ३७७७ या भरधाव कारवरील चालकाचा ताबा सुटून वाहन पुलावरील कठडा ओलांडत थेट नहरात कोसळले.

# गौमातेला "राष्ट्रमाता' घोषित करा; गोंदियात जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य धडक मोर्चा!

**गोंदिया** :-गौमातेला "राष्ट्रमाता' म्हणून घोषित करण्यात यावे तसेच गायींच्या संरक्षण व संवर्धनासाठी स्वतंत्र गोमंत्रालय स्थापन करण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी आज गोंदिया शहरात विविध सामाजिक, धार्मिक आणि गोसेवा संस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर एक भव्य धडक मोर्चा काढण्यात आला. भगवे झेंडे आणि "गौमाता राष्ट्रमाता हो' च्या गजराने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.



मोर्चात सहभागी झालेल्या सर्व संघटनांनी एकाच सुरात गौमातेला राष्ट्रीय दर्जा देण्याची आग्रही मागणी केली. गाय ही केवळ एक पशू नसून भारतीय संस्कृती, शेती आणि आरोग्याचा खरा आधार आहे; त्यामुळे तिला "राष्ट्रमाता'चा दर्जा देऊन तिचे पूर्ण रक्षण झाले पाहिजे, असा सूर वक्त्यांनी लावून धरला. यासोबतच गोशाळांना पुरेसे अनुदान, गोवंशाचे संगोपन आणि गोवंश हत्याबंदीची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने तातडीने स्वतंत्र गोमंत्रालय स्थापन करावे, अशी मागणीही यावेळी रेटण्यात आली.

या आंदोलनाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण जिल्ह्यातून गोप्रेमी नागरिकांच्या गोळा केलेल्या तब्बल ६९ हजार स्वाक्षऱ्यांचे पत्र जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आले. राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांच्या नावाने तयार केलेले हे मागणी निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र व राज्य सरकारकडे रवाना करण्यात आले आहे.

या महामोर्चात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून आणि गावांमधून नागरिक व गोप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरकारने या रास्त मागण्यांकडे तातडीने गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर येत्या काळात यापेक्षाही तीव्र आणि व्यापक आंदोलन छेडले जाईल, असा इशारा आयोजकांनी दिला आहे.

या मोर्चात गोविंद येडे, हंसराम रोकडे, रामकृष्ण बावनकर, कुंवरलाल भगत, जोगा सर, ठाकरे सर, स्वदेश ठाकूर, गौरव वानखेडे, छत्रपाल पटले, सुनील गजभिये, गजानन राय, कोमलप्रसाद गौतम, डॉ. प्रशांत कटरे, शंकरलालजी अग्रवाल, सूरज नसिने, महेश पांडे, जय चौरसिया, भगतजी, विक्की गोहरे, विवेक बैस, देवेश मिश्रा, हरीश अग्रवाल, अंकित कुलकर्णी, पंकज चौधरी, राजीव ठाकरेले, सुनील तिवारी, अजित सिंग, रमेश अग्रवाल यांच्यासह शेकडो गोप्रेमी सहभागी झाले होते.

# डिग्री हातात, कंत्राट पाठीवर: भारतीय तरुणाईचा 'बळी'?

आजची भारतीय तरुणाई आणि विद्यार्थी ज्या बिकट परिस्थितीतून जात आहेत, ते चित्र अत्यंत शोचनीय आहे. सरकारी नोकऱ्यांचे सर्रास कंत्राटीकरण, शाळांचे कंपनीकरण (दत्तक विधान) आणि सरकारी संस्थांचे खाजगीकरण वेगाने सुरु आहे. दुर्दैवाने, ज्या युवाशक्तीच्या खांद्यावर देशाचे भवितव्य आहे, ती तरुण पिढी सोशल मीडियाच्या आभासी दुनियेत आणि राजकीय नेत्यांच्या दावणीला बांधली जाऊन स्वतःच्या भवितव्याबाबत बेफिकीर दिसत आहे. सरकारच्या धोरणांमुळे बेरोजगारीचा आलेख आज मएव्हरेस्टफ्च्या शिखराला भिडला आहे.



**स्पर्धा परीक्षा की जीवघेणा संघर्ष?**

स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल पाहिले तर अंगावर काटा येतो.

दिवस-रात्र अभ्यास करून डोळे खोबणीत गेलेले, गाल बसलेले आणि मनात भवितव्याची चिंता असलेला निस्तेज चेहरा - ही आजच्या अभ्यासू तरुणाची ओळख बनली आहे.

भरतीची जाहिरात नाही, आलीच तर अत्यल्प जागा, वेळेत परीक्षा नाही, निकालाला होणारा अतोनात विलंब आणि त्यात सातत्याने होणारे पेपरफुटीचे ग्रहण; यामुळे विद्यार्थी आणि पालक आर्थिक व मानसिकदृष्ट्या कोलमडले आहेत.

दुसरीकडे, वर्ग-१ च्या मोजक्या जागांवर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना पुन्हा संधी (lateral entry) दिली जात आहे. परिणामी, इंजिनिअर, डॉक्टर, पीएचडी, एमबीए, नेट-सेट, एम.एस्सी. झालेले लाखो तरुण तलाठी, पोलीस, लिपिक, ग्रामसेवक आणि चतुर्थ श्रेणी पदांच्या शर्यतीत रांगेत उभे आहेत. उच्च शिक्षणाचे हे भयानक अवमूल्यन धोरणकर्त्यांच्या अपयशाची साक्ष देते.

**कंत्राटीकरणाचा फास आणि पालकांची परवड**

आज वैद्यकीय विभागापासून ते बँका, महावितरण आणि शासकीय कार्यालयांपर्यंत सर्वच ठिकाणी ११ महिन्यांच्या तुटपुंज्या कंत्राटावर तरुणांना राबवून घेतले जात आहे.

वास्तव इतके भयाण आहे की, रक्ताचे पाणी करून मुलाला शिकवणाऱ्या कष्टकरी बापाला वयाच्या चाळीशीतच म्हातारपण आले आहे. ज्या वयात मुलाने आई-वडिलांना सुखाचे चार घास द्यायचे, त्या वयात आजही शेतात राबून माय-बाप या पदवीधर बेरोजगार मुलांना खाऊ घालत आहेत.

कंत्राटी भरतीमुळे तरुणांना कायमस्वरूपी नोकरीचे संरक्षण नाही, बँकेचे कर्ज मिळत नाही आणि भविष्याची कोणतीही हमी नाही. दुसरीकडे, महाराष्ट्रात शासकीय विभागात अडीच लाखांपेक्षा जास्त पदे रिक्त असताना, ती पदे कायमस्वरूपी भरण्याऐवजी ठेकेदारांमार्फत कंत्राटी पद्धतीने भरण्याचा घाट घातला जात आहे. हे आरक्षणाची चौकट मोडून काढण्याचे दुष्ट चक्र आहे.

**शिक्षणाचे बाजारीकरण आणि 'दत्तक' शाळा**

डॉ. पंजाबराव देशमुख आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वतःचे सर्वस्व पणाला लावून सर्वसामान्यांसाठी शिक्षणाची दारे उघडी केली. परंतु आज शाळांच्या मदत्तक विधानाफ्च्या नावाखाली सरकारी शाळांचा लिलाव मांडला जात आहे.

**सुविधांचा अभाव**

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही ग्रामीण भागातील शाळांच्या इमारती पडक्या आहेत, पिण्याचे शुद्ध पाणी नाही, स्वच्छतागृहांची दुरवस्था आहे आणि शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा अतिरिक्त ताण आहे.

**शिक्षणाचा व्यापार**

ज्या कंपन्या उडत फंड देतील, त्यांना शाळा दत्तक देऊन भविष्यात शिक्षणाचे पूर्ण बाजारीकरण केले जाईल. दिल्ली किंवा केरळ राज्यांप्रमाणे बजेट वाढवून सरकारी शाळा हायटेक करण्याऐवजी, महाराष्ट्र सरकार शिक्षणाची जबाबदारी खाजगी भांडवलदारांच्या घशात घालत आहे.

**तरुणांनो, कपाळावरचा हात काढा आणि जाब विचारा!**

आपण मजूर, कास्तकारांची मुले ऐन उमेदीत राजकीय पक्षांचे झेंडे हातात घेऊन रस्त्यावर उतरतो, मोर्च्यात जातो, दंगलीत लाठ्या-काठ्या खातो आणि तुरुंगात सडतो.

कधी कोणत्या मंत्र्याची, खासदाराची किंवा सनदी अधिकाऱ्याची मुले अशा मोर्च्यांत किंवा दंगलीत पाहिली आहेत का?

मुळीच नाही! कारण त्यांची मुले ऑक्सफर्ड, केंब्रिज, कोलंबिया किंवा अमेरिकेत शिक्षण घेऊन मोठे उद्योग किंवा उच्च पदे सांभाळत असतात.

मग ही दरी कधी मिटणार? तरुणांच्या हातात रोजगार देण्याऐवजी धर्म-जातीचे फासे फेकून त्यांची क्रयशक्ती नष्ट केली जात आहे. ममेक इन इंडियाफ आणि मस्किल इंडियाफच्या नावाखाली अब्जावधी रुपये खर्च होऊनही दरवर्षी बाहेर पडणाऱ्या लाखो टेक्निकल ग्रॅज्युएट्सना हाताला काम मिळत नाही, ही शोकांतिका आहे.

**वेळ अजूनही गेलेली नाही: नवक्रांतीचा एल्गार व्हा!**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, शासन ही लोककल्याणकारी संस्था असावी, व्यापार करण्याचे दुकान नव्हे! देशातील तरुणांना फुकटचा शिधा नको आहे, त्यांना त्यांच्या पात्रतेनुसार सन्मानाचा रोजगार हवा आहे. इंजिनिअर किंवा पदव्युत्तर झालेल्या तरुणाने पकोडे तळावे किंवा चहा विकावा, हे त्याच्या कौशल्याचे आणि देशाच्या शिक्षण व्यवस्थेचे विसर्जन आहे.

तरुणांनो! डीजेच्या तालावरील तल्लीनता आणि सोशल मीडियाचा आभासी मोह आता बाजूला ठेवा. कपाळावर हात ठेवून बसण्यापेक्षा आणि स्वतःची ऊर्जा निरर्थक वादात घालवण्यापेक्षा आपल्या हक्काच्या रोजगारासाठी, दर्जात्मक शिक्षणासाठी आणि सुरक्षित भविष्यासाठी सत्ताधाऱ्यांना थेट प्रश्न विचारा!

**तरुणांचा एकच निर्धार:**

*कंत्राटीकरण हटवा - बेरोजगार वाचवा!

*शाळांचे कंपनीकरण थांबवा - गुणवत्तापूर्ण शिक्षण वाचवा!

*सरकारी रिक्त पदे तात्काळ कायमस्वरूपी भरा!

*कौशल्यानुसार हक्काचा रोजगार द्या - नाहीतर खुर्चीवरून खाली उतरा!

जीस और जवानी चलती है।
उस और जमाना चलता है।

**हरिश पुंडलिकराव कुडे,**
जवळा, ता. आर्णी, जि. यवतमाळ,९८५०३०११३४

# पोरांनो,तुम्ही इतिहास निर्माण केलाय!

जिगरबाज पोरांनो, हातात लाठी,बंदुका,आसू गॅस,पॅलेट गन घेतलेले शेकडो पोलीस ! प्रचंड दहशत आणि भीतीचे वातावरण ! कधी काय होईल याचा नेम नाही ! तरीसुद्धा या दडपशाही विरुद्ध न झुकता,न वाकता,शरण न जाता आपण जो इतिहास निर्माण केलाय त्याबद्दल तुम्हा सर्वांना हृदयापासून मानाचा मुजरा ! आमच्या सरकारमध्ये राजीनामे होत नसतात अशी दर्पोक्ती,अहंकार,उन्मत्तपणा नसनसात भरलेल्या उर्मट आणि उथळ लोकांना आपण त्यांची जागा दाखवून दिली याचा इतिहास लिहिल्या जाईल.

जगाचा इतिहास हा तरुणाईचा इतिहास आहे हे आयुष्यभर खोट्या इतिहासात रमणाऱ्या खोटारड्यांना माहीत नसल्यामुळे त्यांनी तुम्हाला हलक्यात घेतले.परंतु १५ व्या वर्षी बाबू गेनू आणि २३ व्या वर्षी भगतसिंग या तरुणांनीच बलाढ्य गोऱ्यांना झुकविले होते एवढा अभ्यास त्यांच्याकडे नसल्यामुळे किंवा असला तरी तो मान्य करण्याचा मोठेपणा नसल्यामुळे तुम्ही त्यांना पराभूत केले.

लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यापेक्षा त्यांच्यासाठी एक अहंकारी मंत्री महत्त्वाचा होता.फ्परीक्षा पे चर्चाफ करणाऱ्यांनी आयुष्यात कधी परीक्षाच दिलेली नसल्यामुळे त्यांना तुमच्या मेहनतीचे मर्म समजले नाही.म्हणून एका मंत्र्याला वाचविण्यासाठी त्यांनी देशातील सर्व यंत्रणा कामाला लावली.

परंतु तुम्ही त्यांचेही बाप निघाले.लाठ्या खाल्ल्या,जखमी झाले,रक्तबंबाळ झाले,केसेस अंगावर घेतल्या परंतु हिम्मत हरले नाही.चौफेर सुरक्षेमध्ये स्टेजवरून आवेशात आपल्या छातीची मापे सांगणारे तुम्हाला घाबरून संसदेच्या मागच्या दाराने पळून गेले आणि सर्वांच्या लक्षात आले की तुम्हाला टक्कर देण्याची त्यांची छाती नाही.तेव्हाच तुमचा विजय निश्चित झाला होता पोरांनो !

हिम्मतबाज पोरांनो, तुम्ही आधुनिक काळातील ऋशप न आहात.तुमचं लिहिणं,बोलणं, वागणं,भाषा सगळं काही फार वेगळं आहे.त्यामुळे बुरसटलेल्या विचारांच्या लोकांनी तुम्हाला समजून घेण्यात गफलत केली.७५ वर्षाच्या अशिक्षित प्रधानाला तुमच्यासारख्या उच्चशिक्षित पोरांची भाषा समजणे तर फारच कठीण ! तुम्हीच त्यांना सत्तेपर्यंत पोहोचविले याचाही त्यांना विसर पडला आणि त्यांनी तुमच्यावरच आक्रमण केले.ही शुद्ध बेईमानी होती.पण तुम्ही जराही घाबरले नाही.

आमच्या पोरींनी तर कमालच केली ! जिजाऊ,सावित्री,अहिल्या, रमाई यांचे कार्य आम्ही फक्त ऐकून,वाचून होतो; पण आज या पोरींमध्ये अवतरलेल्या या सर्व महानायिका प्रत्यक्षात देशाने अनुभवल्या.जिजाऊ-सावित्रीचा वारसा खऱ्या अर्थाने कृतीमध्ये आणणाऱ्या या पोरी येणाऱ्या काळात या देशात निश्चितच क्रांती घडविल्याशिवाय राहणार नाही.

१५ ते २५ वयातले तुम्ही सर्व पोरं पोरी ! परंतु प्रचंड बुद्धिमत्ता,अफाट कौशल्य,आधुनिक जगाचा अभ्यास,नवीन तंत्रज्ञानाची माहिती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुमची भन्नाट कल्पकता ! त्यासमोर तर नतमस्तकच व्हावे लागते.

प्रचंड संघर्ष आणि अंगावर लाठ्या पडत असतानाही ज्या खिलाडू वृत्तीने आणि गांधीच्या अहिंसक मार्गाने तुम्ही या सर्व हुकूमशाहीला सामोरे गेलात त्यावरून गांधी आणि आंबेडकर हेच येणाऱ्या काळात या देशाचे आयकॉन राहतील हे आता तुम्ही सिद्ध केले आहे.

गोडसे आणि गोळवलकर यांना कोणी कितीही समोर आणण्याचा प्रयत्न केला तरी ते या देशाच्या तरुण पिढीचे आदर्श असूच शकत नाही हे तुमच्या आंदोलनाने दाखवून दिले.२१ विद्यार्थ्यांचे बलिदान व्यर्थ जाऊ न देता तुम्ही त्यांच्यासाठी जो घनघोर संघर्ष केला तो इतिहासाच्या पानापानावर कोरल्या जाईल.पोरांनो, तुम्ही जी क्रांती केली,ती सध्याच्या काळात इतकी सोपी,सहज आणि सरळ नव्हती.सध्याची सत्ता ही क्रूर, कपटी,उन्मत्त,गर्विष्ठ,अहंकारी, संवेदनाहीन,माणुसकीहीन आणि सामान्य माणसाला किडयामुंग्यासारखी समजणारी आहे.एका माणसाच्या राजहट्टासाठी या धर्मांध लोकांनी महान लोकशाहीचा गळा घोटलेला आहे.

त्यामुळेच प्रत्येक जण तुम्हाला प्रेमाने समजावून सांगत होता की, या तानाशाही प्रवृत्तीच्या सत्तेसमोर तुमचे काही चालणार नाही.तुम्ही सर्वांचे शांतपणे ऐकून तर घेतले,पण काम मात्र स्वतःच्या मेंदूने केले आणि त्यामुळेच तुमचा विजय झाला.



तल्लख बुद्धीच्या पोरांनो, देश सध्या अत्यंत भीषण परिस्थितीतून वाटचाल करीत आहे.खऱ्या स्वातंत्र्यवीरांचे बलिदान विसरायला लावून इंग्रजांसमोर माफीनामे देणाऱ्या लोकांचा उदो उदो देशात सुरू आहे.त्यामुळे तुमची जबाबदारी आणखी वाढलेली आहे.इतिहासाची चिकित्सा करून सत्य इतिहास जगासमोर आणणे आणि भारताला महासत्ता बनवणे यासाठी तुमचा पुढील संघर्ष असला पाहिजे.देशात तुम्ही पेटवलेली क्रांतीची आग वणवा बनून निश्चितच परिवर्तन घडवून आणेल आणि या देशाची लोकशाही पुन्हा एकदा नव्या तेजाने उजळून येईल अशी आम्हाला आशा आहे.त्यासाठी तुमचा आजचा संघर्ष कारणीभूत ठरेल.हुशार पोरांनो, तुम्हीच खरे या देशाचे भविष्य,आधारस्तंभ आणि येणाऱ्या काळातील आयकॉन आहात.तुमच्या संघर्षाला मनापासून सलाम !

**प्रेमकुमार बोके**
अंजनगाव सुर्जी

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# शाळाबाह्य,अनियमित व स्थलांतरीत बालकांचा डायट प्राचार्य व शिक्षणाधिकाऱ्यांनी घेतला शोध

**गोंदिया :–** शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य यांचे २९ मे २०२६ चे पत्रान्वये शाळाबाहय, अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करुन त्यांचे शिक्षण अबाधित राखण्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाने १५ जुलै ते ३० जुलै २०२६ या कालावधीमध्ये ३ ते १८ वयोगटातील बालकांचे सर्वेक्षण राबविण्याचे ठरविले असून त्याबाबतची डजझ ची प्रत व माहिती संकलनाचे षीरीी प्राप्त झालेले आहे. हे महत्वपूर्ण सामाजिक काम शासनाच्या संबंधित सर्व विभागाचा सहभागाने करण्याबाबत निर्देश आहेत. सर्व संबंधित विभागातील सर्व ग्रामीण व नागरी भागातील सर्व स्तरावरील कार्यालयांना सदरच्या महत्वपूर्ण कामात मदत करण्याबाबत आदेशित करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये निर्देश आहेत. या महत्वपूर्ण शैक्षणिक उपक्रमात महसूल, ग्रामविकास, नगरविकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य,



महिला व बालविकास, कामगार विभाग, आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग आणि सार्वजनिक आरोग्य व गृह विभाग या विभागातील अधिकाऱ्यांच्या सहभागाने हे सर्वेक्षण राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

तालुक्यातील सर्व विभागाच्या ग्रामीण व नागरी भागातील सर्व स्तरावरील कार्यालयांना सदरच्या महत्वपूर्ण कामात सर्वतोपरी मदत करण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. तसेच ज्या काही योजना व इतरही काही सुविधा विभागांकडून सदर बालकांना उपलब्ध करून देणे शक्य होईल त्या उपलब्ध करुन द्याव्यात, जेणेकरुन सदर सर्वेक्षणाचे काम फलदायी होईल. विशेषतः शहरी भागात भिक मागणारे, भटके कुटुंबातील बालके आढळतात, अशा बालकांचे सर्वेक्षणाकरीता नगर परिषद प्रशासनाने विशेष लक्ष देऊन अशा बालकांचा शोध घेण्याकरीता सर्वतोपरी सहकार्य करण्याचे निर्देश आहेत.

सर्वेक्षण दि.२४ जुलै २०२६ रोजी शाळाबाहय, अनियमित व स्थलांतरीत बालकांचा शोध घेण्याकरीता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य राजकुमार हिवारे, शिक्षणाधिकारी (प्राथ.) पवन खंदारे, जिल्हा समन्वयक बालरक्षक कुलदीपिका बोरकर, विषय साधन व्यक्ती वशिष्ठ खोब्रागडे, सामाजिक कार्यकर्त्या सविता बेदरकर यांनी अण्णाभाऊ साठे नगर (कुडवा) व गोंडीटोला कटंगी, ता. गोदिया येथे प्रत्यक्षात जाऊन भेट दिली.

अण्णाभाऊ साठे नगर (कुड्या) व गोंडीटोला कटंगी या वस्तीतील कुटुंब प्रमुख, महिला, किशोरवयीन मुली, मुले, वरिष्ठ नागरीक व ३ ते १८ वयोगटातील बालके या सर्वांसोबत डायटचे प्राचार्य तसेच शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी संवाद साधला, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. जे मुले वस्तीत आढळली त्यांना शाळेत नियमित जाण्याबाबत विनंती करण्यात आली. काही मुला–मुलींना सायकलची आवश्यकता असल्याचे लक्षात आले. करीता सर्वांना विनंती करण्यात येत आहे की, ज्यांच्या चांगल्या सायकल घरी आहेत, ज्या वापरात नाही त्यांनी सदर मुलांसाठी द्याव्या असे आवाहन डायटचे प्राचार्य राजकुमार हिवारे व शिक्षणाधिकारी (प्राथ.) पवन खंदारे यानी केले आहे.

शासनाच्या ज्या सुविधांचा लाभ देणे शक्य होईल त्या सुविधा योजना सदर बालकांपर्यंत पोहचविण्यात येईल असे अधिकाऱ्यांनी वस्ती प्रमुखांना सांगितले. सविता बेदरकर यांनी संपूर्ण वस्तीतील पालकांशी संवाद घडवून आणला, तेथील समस्यांबाबत माहिती दिली. तेथील स्थानिक अंगणवाडीमध्ये सुध्दा भेट देण्यात आली.

अण्णाभाऊ साठे नगर (कुडवा) व गोंडीटोला कटंगी या दोन्ही वस्तीतील प्रमुखांना विद्यार्थ्यांची यादी मागविण्यात आलेली आहे, जेणेकरुन आवश्यक त्या सुविधा बालकांपर्यंत पुरविणे शक्य होईल. सदर वस्तीमध्ये प्रत्यक्ष भेटी दरम्यान जवळपास २० ते २५ विद्यार्थी अनियमित असल्याचे निदर्शनास आले. सदर सर्व विद्यार्थ्यांना नियमित शाळेत पाठविण्याबाबत पालकाचे समुपदेशन करण्यात आले.

## महसूल जनकल्याण शिबिरांचा वेध : प्रलंबित कामांना वेग, योजनांचा लाभ "एकाच छताखाली"

**गोंदिया :–** नागरिकांच्या प्रलंबित महसुली कामांचा तात्काळ निपटारा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी महसूल व वन विभागाच्या पुढाकारातून गोंदिया जिल्ह्यात २२ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत "महसूल जनकल्याण शिबिरे" आयोजित करण्यात येत आहेत. या शिबिरांचा आढावा आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आला.



या बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, सर्वश्री आमदार डॉ. परिणय फुके, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, पंचायत समितीचे पदाधिकारी, जिल्हाधिकारी मंदार पत्की, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपविभागीय अधिकारी चंद्रकांत खंडाईत, ज्योती कांबळे, तहसीलदार समशेर पठाण, अप्पर तहसीलदार श्रीकांत कांबळे, अनिरुद्ध कांबळे, इंद्रायणी गोमासे यांच्यासह अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर अर्जुनी मोरगाव येथील शिबिराची तारीख बदलून २ ऑगस्ट करण्यात आली असून, १ ऑगस्ट रोजी गोंदिया येथील जलाराम लॉन्स आणि २ ऑगस्ट रोजी अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील सडक अर्जुनी येथील आशीर्वाद हॉल येथे शिबिरे पार पडणार आहेत.

शिबिरांपूर्वी लाभार्थ्यांची पूर्व तपासणी, पात्रता पडताळणी आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. ङ्गएकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये,ङ्घ अशा सूचना आमदार डॉ. परिणय फुके यांनी दिल्या.

तहसीलदार समशेर पठाण यांनी माहिती देताना सांगितले की, २२ जुलै ते २ ऑगस्टदरम्यान विविध योजनांअंतर्गत लाभार्थ्यांपर्यंत प्रत्यक्ष लाभ पोहोचविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. गोंदिया येथे होणाऱ्या शिबिरात विविध विभागांमार्फत अनेक प्रकारचे लाभ एकाच ठिकाणी वितरित केले जाणार आहेत.

राज्य शासनाच्या "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान" अंतर्गत आयोजित या शिबिरांमुळे महसूल विभागाच्या सेवा अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचणार आहेत. यामध्ये महसूल विषयक सेवा, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, आयुष्मान भारत योजना, वनपट्टे व जमीन पट्टे वाटप अशा महत्त्वपूर्ण योजनांचा लाभ थेट गरजू नागरिकांना दिला जाणार आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या फेऱ्यांपासून मुक्त करून "सेवा तुमच्या दारी" या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करणे होय. प्रत्येक विधानसभा क्षेत्राच्या गरजेनुसार नियोजन करून, लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था आणि विविध विभागांच्या समन्वयातून ही शिबिरे यशस्वीपणे पार पडणार आहेत.

## १० वर्षांखालील एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनाची मागणी राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांना निवेदन



**गोंदिया:–**राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत १० वर्षांपेक्षा कमी सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचेही शासन सेवेत समायोजन करण्यात यावे, यासाठी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर आणि विधानपरिषद सदस्या डॉ. मनीषा फायंदे यांना निवेदन सादर करण्यात आले.

राज्य शासनाने नुकताच एनएचएम अंतर्गत सलग १० वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा पूर्ण केलेल्या सुमारे १५,०१० कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना सेवा सुरक्षितता, समकक्ष वेतनश्रेणी आणि शासन सेवकांप्रमाणे लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, १० वर्षांपेक्षा कमी सेवा असलेल्या कर्मचाऱ्यांना या निर्णयातून वगळण्यात आल्याने त्यांच्यावर अन्याय झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

महासंघाने दिलेल्या निवेदनात, १० वर्षांखालील एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य आणि सेवा सुरक्षिततेचा विचार करून त्यांच्यासाठी स्वतंत्र धोरण जाहीर करावे तसेच लवकरात लवकर नवीन शासन निर्णय काढून त्यांनाही शासन सेवेत सामावून घ्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय विविध शासकीय आस्थापनांमध्ये अल्प मानधनावर अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवादेखील नियमित करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी या मागणीबाबत मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील सहकारी मंत्र्यांशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही प्रतिनिधींना दिली.

निवेदन सादर करताना महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे राज्य महासचिव गजानन थूल, सुमंत ढोबळे, डॉ. नम्रता सलूजा, मयूर भारद्वाज, निलेशकांत थूल, कुलभूषण मुरायते, प्रणव देवळे यांच्यासह राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अनेक कर्मचारी उपस्थित होते.

## सालेकसा येथे स्वच्छता अभियान उत्साहात

**सालेकसा :–** सालेकसा येथे २३ जुलै रोजी भव्य स्वच्छता अभियान राबवण्यात आले. नगर पंचायत सालेकसाच्या विद्यमाने राबवलेल्या या अभियानात लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून बसस्थानक परिसर, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसर तसेच महात्मा गांधी स्मारक परिसराची स्वच्छता करत नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला.



सदर कार्यक्रम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ. अजय उमाटे यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. या स्वच्छता अभियानात नगर पंचायतीच्या स्वच्छता, पाणीपुरवठा व आरोग्य सभापती छन्नुताई शिवणकर, नगरसेवक

डॉ. राजेंद्र बडोले, जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवने, शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, महिला शहराध्यक्ष सुनिता थेर, तालुका युवती अध्यक्षा सुषमाताई राऊत, उषाताई व्हरहाडे, राहुल जंगेरे, रिषी बैस, दिवाकर सोनवाने, उद्योजक अनिल अग्रवाल, सामाजिक कार्यकर्ते विष्णू वशिष्ठ, नरेश अग्रवाल, भास्कर शिवणकर, नंदकिशोर शाह यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते व नगर पंचायतीचे स्वच्छता कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

### महावितरणच्या वीजबिल व स्मार्ट मीटर तक्रारींसाठी ३० जुलै रोजी तिरोड्यात तक्रार निवारण शिबिर

**तिरोडा:–** महावितरण कंपनीकडून येणाऱ्या वीजबिलांबाबत तसेच स्मार्ट मीटर, सौर ऊर्जा (सोलर) योजनेशी संबंधित विविध तक्रारींचे निवारण करण्यासाठी तिरोडा येथे विशेष ग्राहक तक्रार निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर ३० जुलै २०२६ (गुरुवार) रोजी सकाळी १०.३० वाजता अजय गौर यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात (फॉरेस्ट ऑफिस जवळ), तिरोडा येथे होणार आहे.या शिबिरात वाढीव वीजबिलांबाबतच्या तक्रारी, स्मार्ट मीटरसंदर्भातील अडचणी, सोलर यंत्रणा बसवल्यानंतर उद्भवलेल्या समस्या तसेच इतर वीजबिलाशी संबंधित तक्रारींची सुनावणी करून त्यांचे निवारण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## विकासाची वाट पाहणारे आदिवासी गाव

**देवरी:–** तालुका सीमेवरील पळसगाव /चुटिया ग्रामपंचायत अंतर्गत येणारे पूर्णतः आदिवासी बहुल करूझरी गाव आजही मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे विदारक वास्तव समोर आले आहे. देशाने नुकताच स्वातंत्र्याचा ७८वा वर्धापन दिन साजरा केला असला, तरी करूझरी गावातील नागरिकांना अजूनही पक्क्या रस्त्याची प्रतीक्षा कायम आहे. विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या या गावाकडे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याची भावना ग्रामस्थांमध्ये तीव्र होत आहे.

गावात जाण्यासाठी आजही नागरिकांना नाल्यातून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो. संबंधित नाल्यावर पूल नसल्याने पावसाळ्यात परिस्थिती अधिक बिकट होते. नाल्याला पूर आल्यास गावाचा संपर्क पूर्णतः तुटतो.याचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसत असून, पुढील शिक्षणासाठी बाहेरगावी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण अनेकदा खंडित होते.

पोटाची खळगी भरण्यासाठी बाहेरगावी मजुरीसाठी जाणाऱ्या मजुरांनाही पावसाळ्यात गावातच अडकून राहावे लागते. त्यामुळे अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ येत असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

सुमारे १०० लोकसंख्या असलेल्या या गावांचा मुख्य व्यवसाय शेती असून, गावात फक्त चौथीपर्यंत शिक्षणाची सुविधा आहे. पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना इतर गावांमध्ये जावे लागते.

### ५ व १५ वर्षे वयोगटातील मुलांसाठी आधार बायोमेट्रिक अपडेट मोहीम

**गोंदिया:–** आधार नोंदणी नियमानुसार पाच वर्षांखालील मुलांचे नोंदणीवेळी केवळ चेहऱ्याचा फोटो व लोकसंख्याशास्त्रीय माहिती घेतली जाते. बोटांचे ठसे व डोळ्याच्या बुबुळाचे (आयरीस) बायोमेट्रिक घेतले जात नाहीत. त्यामुळे पाचव्या वर्षी (चइण१) व पंधराव्या वर्षी (चइण२) बायोमेट्रिक अद्ययावत करणे अनिवार्य आहे.

मात्र, निरीक्षणात असे आढळून आले आहे की, जिल्ह्यातील मोठ्या संख्येने ५ ते १५ वयोगटातील मुलांनी अद्याप पहिला बायोमेट्रिक अपडेट (चइण१) केलेला नाही. तसेच अनेक विद्यार्थ्यांचे पंधरा वर्षांनंतरचे दुसरे बायोमेट्रिक अपडेट (चइण२) प्रलंबित आहे. यामुळे गएए, छएएढ यासारख्या स्पर्धा परीक्षांवेळी बायोमेट्रिक प्रमाणीकरणात अडचणी निर्माण होतात व अचानक मोठ्या प्रमाणावर अद्ययावत करण्यासाठी गर्दी होते.

ही परिस्थिती टाळण्यासाठी व प्रलंबित अपडेट पूर्ण करण्यासाठी शासनाने सदर अभियान मिशन मोडवर राबविण्याचे निर्देश दिले


## कृषि उत्पन्न बाजार समिती, गोरेगांव जिल्हा गोंदिया

### कृ.उ.बा.स. गोरेगांव चे मुख्य बाजार आवार येथे रोडलगत पहिला माळा २० व्यवसायिक गाळे

### जाहिर प्रगटन

**मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया यांचे आदेश जिउनिगो/कृउबास/गोरेगांव / १२(१) प्रस्ताव/व्यापारी गाळे (भाग–१)/५१६/२०२४ दिनांक २३ जानेवारी २०२४ अन्यये आणि मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया यांचे आदेश क्र. जिउनिगो/कृउबास/गोरेगांव / १२(२) प्रस्ताव/व्यापारी गाळे (भाग–१)/५९४/२०२४ दिनांक २३ जानेवारी २०२४ अन्वये, गोरेगांव कृषि उत्पन्न बाजार समितीला मुख्य बाजार आवार येथील जागेमध्ये शासनाद्वारे मंजुर करण्यात आलेले व्यापारी संकुल (शॉपींग कॉम्प्लेक्स) २० नग प्रतिगाळा रुपये २ लाख बिनव्याजी अनामत आकारुन प्लॅन व इस्टीमेंटप्रमाणे साईज असलेले सदरचे गाळे नोंदणीकृत कराराने बाजार भावाचा विचार करून दरमहा १०००/– आकारुन इच्छुक व्यवसायीक लोकांना विविध कृषी विषयक व्यवसायाकरिता समितीचे अटी व शर्तींवर भाडे तत्वावर द्यावयाचे आहेत.**

**त्यासाठी इच्छुक व्यवसायीक लोकांकडून अर्ज दिनांक २९/०७/२०२६ ते दिनांक १०/०८/२०२६ या कालावधीत समितीव्दारे मागविण्यात येत आहेत. बिनव्याजी अनामत बाजार समितीला घ्यावयाची असुन अर्जासोबत आधारकार्ड, पॅनकार्ड, मोबाईल नं. इ. कागदपत्रे जमा करावयाची आहेत. अनामत रक्कम २ टप्प्यांमध्ये १ महिन्याचे कालावधीत चेक द्वारे किंवा रोखीने बाजार समितीमध्ये जमा करावयाची आहे.**

**बाजार समिती गाळे वाटप तसेच हर्रासी बाबतचे नियम, अटी व शर्ती, गाळ्यांची साईज इ. कार्यलयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन पाहावयास मिळतील. गाळे वाटप करण्याचे अथवा रद्द करण्याचे अधिकार बाजार समितीने राखुन ठेवले आहे.**

आशिष डी.बघेले, सचिव — तेजेंद्र आर.हरिणखेडे, उपसभापती — गिरधारी एम.बघेले, सभापती


## गोरेगाव नगर पंचायत जनतेच्या दारात

**गोरेगाव:–** नगरातील विकासकामे केवळ कागदावर न राहता ती प्रत्यक्ष नागरिकांपर्यंत पोहोचली पाहिजेत, प्रत्येक प्रभागातील नागरिकांच्या अडचणी प्रशासनाने त्यांच्या दारात जाऊन ऐकल्या पाहिजेत आणि निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरली पाहिजेत, या उद्देशाने गोरेगाव नगर पंचायतीने रविवारी एक अभिनव आणि लोकाभिमुख उपक्रम राबविला. प्रभाग क्रमांक १, ८, ९ आणि ११ मध्ये विशेष पाहणी व जनसंवाद मोहीम राबवून नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेतल्या.

या मोहिमेचे नेतृत्व नगर पंचायत अध्यक्ष तेजराम बिसेन यांनी केले. त्यांच्यासोबत नगर पंचायत उपाध्यक्ष मलेश्याम येरोला, बांधकाम सभापती पवन राहंगडाले, मुख्याधिकारी नगर पंचायत सदस्य राहुल येले, कमलेश बारेवार, आदेश थुलकर, साहिल कुरैशी उपस्थित होते. सर्व पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या वस्त्यांमध्ये जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. या दौऱ्यात अनेक भागांतील रस्त्यांची दुरवस्था, नाल्यांची अपुरी व्यवस्था, सार्वजनिक शौचालयांची गरज, पिण्याच्या पाण्याशी संबंधित अडचणी, स्वच्छता, गटारी, रस्ते दुरुस्ती, प्रकाश व्यवस्था तसेच इतर मुलभूत नागरी सुविधांबाबत नागरिकांनी आपल्या भावना आणि अपेक्षा स्पष्टपणे मांडल्या. नागरिकांनी वर्षांनुवर्षे प्रलंबित असलेल्या समस्यांकडे पदाधिकाऱ्यांचे लक्ष वेधत विकासकामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. विशेष म्हणजे, निवडणुकीपूर्वी जनतेसमोर मांडण्यात आलेल्या विकासाच्या संकल्पनांची आठवण करून देत अनेक नागरिकांनी आपल्या परिसरातील प्रश्न मांडले. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक समस्येची नोंद घेत संबंधित विभागामार्फत कारवाई करण्याचे आश्वासन दिले. नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी नव्याने विश्वास निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

**विविध विकासकामांना लवकरच गती देणार**

उपाध्यक्ष मलेश्याम येरोला यांनी विकासकामांमध्ये कोणतीही कुचराई होणार नसल्याचे सांगितले, तर बांधकाम सभापती पवन राहंगडाले यांनी विविध विकासकामांना लवकरच गती दिली जाईल, असे स्पष्ट केले. या उपक्रमामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक दृढ झाला असून, जनतेच्या दारी प्रशासन ही संकल्पना प्रत्यक्षात उतरल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. तसेच अशा पाहणी व जनसंवाद मोहिमा सातत्याने राबविण्याची अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली.

### एमपीएससीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह धोक्याची घंटा!

**नागपूर:–**महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक भरती प्रक्रियेवर झालेल्या गंभीर आरोपांमुळे राज्यभरातील विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुरुवातीला पेपरफुटीचा आरोप करणाऱ्या तक्रारदारानेच नंतर ई–मेलद्वारे ती तक्रार बनावट असल्याचा दावा केल्याने हे प्रकरण अधिकच संशयास्पद बनले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक आणि वेळबद्ध चौकशी विशेष तपास समिती मार्फत करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी बहुजन समाज पार्टी चे माजी प्रदेशाध्यक्ष,बहुजन नेते डॉ.एड.संदीप ताजने यांनी केली आहे.


## महाराष्ट्र शासन

### कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग,चंद्रपूर-४४२४०१

### निविदा सुचना क्र.७३/२०२६-२७

कार्यकारी अभियंता सा.बां. (आदि) विभाग, चंद्रपूर हे खालील कामाच्या मोहोरबंद निविदा ब–१ प्रपत्रामध्ये आदिवासी विकास विभागातील नोंदणीकृत संबंधित जिल्ह्यातील सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्याकडून मागवित आहे. कोरी निविदा प्रपत्र रकाना क्र.७ मध्ये दर्शविलेल्या तारखेपर्यंत कार्यकारी अभियंता सा.बां.(आदि) विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयातून कामकाजाचे दिवशी विहिती किमत भरुन प्राप्त करुन घेता येईल. भरलेली निविदा प्रपत्र रकाना क्र.८ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिनांकास १७.०० वाजता किंवा कार्यकारी अभियंता सा.बां.(आदि) विभाग, चंद्रपूर हे कळवतील त्या दिनांकास व वेळेस मोहरबंद निविदा या कार्यालयात उघडण्यात येतील. निविदा खरेदी केल्यानंतर खरेदी केल्याची पावती निविदे सोबत सादर करणे बंधनकारक राहील. व कोरे निविदा प्रपत्र खरेदी केल्यावर निविदा प्रपत्र योग्य भरुन स्वतःची व साक्षिदाराची स्वाक्षरी सिलबंद लिफाफ्यात रकाना क्र.८ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) | बयाना रक्कम (रुपये) | कामाचा कालावधी | कंत्राटदाराची वर्गवारी निविदा प्रपत्राची किंमत) | कोरी निविदा प्राप्त करण्याचा कालावधी ठिकाण व दिनांक | भरलेली सिलबंद निविदा स्विकृतीचे ठिकाण व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | Providing Waterproofing Treatment to ITDP Project Office Building at.Deori,Ta.Deori Dist.gondia | ८,१८,५९६ | ९,००० | ३ महिने | सु.बे.अ.रु.कि. ५९०/– | दि.२९.०७.२०२६ ते ०५.०८.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.०५.०८.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| २ | Construction of Shed for Store Cooler Furniture and other Misc Items in ITDP Premises Deori Ta Deori,Dist.Gondia | ८,०१,१०४ | ९,००० | ३ महिने | सु.बे.अ.रु.कि. ५९०/– | दि.२९.०७.२०२६ ते ०५.०८.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.०५.०८.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| ३ | Repairs to Sub Office of ITDP Deori in Collector office Building at.Gondia,Ta.Distt.Gondia | ८,०१,०४४ | ९,००० | ३ महिने | सु.बे.अ.रु.कि. ५९०/– | दि.२९.०७.२०२६ ते ०५.०८.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.०५.०८.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| ४ | Making Cupboard,Shelves,Tables for Office Staff at.ITDP Project Office Deori,Ta.Deori,DIst.Gondia | ७,८२,५०३ | ८,००० | ३ महिने | सु.बे.अ.रु.कि. ५९०/– | दि.२९.०७.२०२६ ते ०५.०८.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.०५.०८.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| ५ | Providing Partation for Office staff of accounting and planning Section of Intigrated Tribal Development Project Office Deori, Ta.Deori,Distt.Gondia | ४,८८,२७९ | ५,००० | ३ महिने | सु.बे.अ.रु.कि. ५९०/– | दि.२९.०७.२०२६ ते ०५.०८.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.०५.०८.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| ६ | Construction of Parking Shed for Vehicle in ITDP Premises Deori,Ta.Deori,Dist.Gondia | २,५२,९६५ | ३,००० | ३ महिने | सु.बे.अ.रु.कि. ५९०/– | दि.२९.०७.२०२६ ते ०५.०८.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.०५.०८.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |

**अटी व शर्ती:** १) खालील कारणांमुळे आपली निविदा रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.
१)१) निविादा प्रपत्राची सुस्पष्ट न दिसणारी प्रति २) अपूर्ण निविदा प्रपत्र (पान कमी असलेले) ३) निविदा पपत्रामध्ये कंत्राटदाराकडून छापील मजकूरामध्ये खोडतोङ व बदल करणे. ४) निविदेसोबत जोडण्यात येणारे आवश्यक कागदपत्र राजपत्रित अधिकाऱ्याकडून साक्षांकित न केलेले कागदपत्र व अपूर्ण कागदपत्रे ५) निविदा खरेदी केल्याची पावती निविदेसोबत सादर न करणे. ६; निविदेच्या लिफाफावर कामाचा संपूर्ण नाव व कंत्राटदाराचा संपूर्ण नाव पत्तेसहित व स्वाक्षरी न केलेले लिफाफे. ७) निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट–१)१००/– स्टॅप पेपरवर लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात येत आहे. (टिप:– स्टॅपल केलेले लिफाफे स्विकारण्यात येणार नाही व सिलबंद लिफाफे सादर करावे.) २) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये योग्य त्या वर्गात पंजीबद्ध असल्याबाबतचे अद्यावत पंजीयन साक्षांकित प्रत लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे अनिवार्य राहील.३) बयाना (इसारा) रक्कम शेडयूल बँकेच्या एक वर्षमुदतीचे टर्म डिपॉझीटच्या स्वरूपात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आ.) विभाग, चंद्रपूर यांचे नावे जोडणे आवश्यक आहे. किंवा शासन सा.बां.विभाग निर्णय दिनांक २०.०४.१९९८ नुसार नविन नियमाप्रमाणे आवश्यक रक्कम भरुन बयाना रक्कम भरण्यापासून सुट प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. किंवा शासन सा.बां.निभाग निर्णय दिनांक २०.०४.१९९८ नुसार नविन नियमाप्रमाणे आवश्यक रक्कम भरुण बयाना रक्कम भरण्यापासून सुट प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच साक्षांकित केलेले प्रमाणपत्र लिफाफा क्र.१ मध्ये निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. ४) कामाची निविदा उघडण्याच्या दिनांकापासून ६० दिवस तथा कंत्राटदाराने लेखी सुचना देईपर्यंत विधीग्राह्य राहील. ५) निविदा विषयक सर्व साक्षांकित कागदपत्रे लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावे व लिफाफा क्र.२ मध्ये भरलेली निविदा प्रपत्र सादर करावे.प्रति: १) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपूर–४४२४०१ यांचे कार्यालयातील सुचना फलक २) सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, नागपूर यांना माहितीस अग्रेषित.

जिमाका/गों/जाहि/४४/२०२६

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग चंद्रपूर**


## पिंडकेपारच्या मामा तलावाचे पाणी नाल्यात

**गोंदिया:–**शासनाच्या मामा (माजी मालगुजारी) तलाव पुनर्जीवन योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून तलावांचे खोलीकरण व दुरुस्तीची कामे करण्यात येत आहे. मात्र, गोरेगाव तालुक्यातील पिंडकेपार येथील लघु तलावाच्या पुनर्जीवन कामात निकृष्ट दर्जाचे बांधकाम झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वेस्ट वेअर (रपटा) तांत्रिक निकषांनुसार न बांधल्याने तलावातील पाणी थेट नाल्यात वाहून गेले असून, याप्रकरणी चौकशी करून कारवाईची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.



जिल्हा परिषदेच्या जलसंधारण (लघु सिंचन) विभागामार्फत जिल्ह्यातील मामा तलावांचे पुनर्जीवनाचे कार्य करण्यात आले आहे. या योजनेचा उद्देश तलावांची पाणी साठवण क्षमता वाढवून शेतकरी व ग्रामस्थांना वर्षभर पाण्याचा लाभमिळवून देणे हा आहे. मात्र, पिंडकेपार येथील लघु तलावाच्या कामामुळे उद्देशालाच हरताळ फासल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. योजनेंतर्गत पिंडकेपार येथील लघु तलाव, सावरा तलाव आणि मोठ्या तलावाची दुरुस्ती करण्यात आली.

मात्र, लघु तलावावरील वेस्ट वेअर पिचिंगचे काम निकृष्ट झाले असताना वेस्ट वेअर (रपटा) आवश्यक उंचीपेक्षा कमी उंचीचा बांधल्यामुळे तलावात पाणी साठण्याऐवजी नाल्यात वाहून गेले. यापूर्वी या तलावात सात ते आठ फूट पाणी साठवणूक होत असताना आता केवळ दोन ते अडीच फूट पाणीच टिकून राहत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. याशिवाय अपेक्षित प्रमाणात खोलीकरण न करता तलावाच्या बांधावर माती टाकून काम पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे. परिणामी, पाणी साठवण क्षमतेत मोठी घट झाली असून, संपूर्ण कामाची तांत्रिक चौकशी करून संबंधित अधिकारी आणि काम करणाऱ्या कंत्राटदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# एनएचएममध्ये भरती,खरेदी व कंत्राटी सेवा विस्ताराला ब्रेक

## जिल्हास्तरावरील सर्व नवीन भरती, खरेदी आणि आउटसोर्स करारांवर तात्काळ स्थगिती; आरोग्य यंत्रणेत खळबळ

**गोंदिया:–** राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन एच एम) अंतर्गत जिल्हास्तरावर करण्यात येणाऱ्या सर्व नवीन खरेदी, कंत्राटी (आऊटसोर्स) मनुष्यबळ भरती, सेवा विस्तार (एक्स्टेंशन), करार नूतनीकरण (रिनिवल) आणि नव्या आर्थिक बांधिलकींवर राज्य प्रशासनाने तात्काळ स्थगिती घातली आहे. मिशन संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी १७ जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशामुळे राज्यातील आरोग्य यंत्रणेत एकच खळबळ उडाली आहे.

आर्थिक शिस्त, खर्चावर नियंत्रण आणि वित्तीय पुनरावलोकनाच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. मात्र या निर्णयामुळे जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतील सेवा विस्कळीत होण्याची भीती व्यक्त होत आहे.

आदेशानुसार जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा लेखा व्यवस्थापक किंवा त्यांच्या माध्यमातून कोणतीही नवीन खरेदी प्रक्रिया, निविदा, खरेदी आदेश, वर्क ऑर्डर अथवा नवीन आर्थिक बांधिलकी निर्माण करणारी कोणतीही कार्यवाही करता येणार नाही. तसेच आउटसोर्स एजन्सीद्वारे नवीन मनुष्यबळ भरती, सेवा विस्तार किंवा करारांचे नूतनीकरणही पुढील आदेशापर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

फक्त अत्यावश्यक आणि सार्वजनिक आरोग्य सेवेला बाधा येण्याची शक्यता असल्यासच संबंधित प्रस्ताव उपसंचालक, आरोग्य सेवा यांच्या विशेष पूर्वमान्यतेनंतरच मंजूर होणार आहेत. आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर संपूर्ण जबाबदारी निश्चित करण्यात येणार असल्याचाही स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, या निर्णयामुळे जिल्ह्यांमध्ये आधीच मनुष्यबळाच्या कमतरतेने त्रस्त असलेल्या आरोग्य व्यवस्थेवर आणखी ताण वाढण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी कंत्राटी कर्मचाऱ्यांवरच आरोग्य सेवा अवलंबून असताना नवीन भरती आणि सेवा विस्तार रोखल्याने रुग्णसेवेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, खर्चावर नियंत्रण आवश्यक असले तरी त्याचा फटका थेट सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य सेवेला बसू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# खैरबंदा टेलवरील १२ गावांना दिलासा: ?३०० कोटींच्या करटी लिफ्ट इरिगेशन योजनेला मंजुरी



**चत्रा कापसे/ तिरोडा:–**तिरोडा–गोरेगाव विधानसभा मतदारसंघातील खैरबंदा जलाशयाच्या सिंचन क्षेत्रातील टेलवरील (शेवटच्या भागातील) १२ गावांचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला सिंचनाचा प्रश्न अखेर सुटला आहे. आमदार विजय रहांगडाले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि राष्ट्रवादी किसान आघाडीचे गोंदिया जिल्हाध्यक्ष डॉ. योगेंद्र भगत यांच्या पुढाकारामुळे मकरटी लिफ्ट इरिगेशनफ या कायमस्वरूपी सिंचन योजनेला शासनाकडून ?३०० कोटींच्या निधीची मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करणाऱ्या हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

३०० कोटींच्या या योजनेमुळे परिसरातील खालील १२ गावांना वर्षभर सिंचनाची सुविधा मिळणार आहे:लाभार्थी गावे: करटी, बोरा, इंदोरा, बिहिरिया, बाघोली, परसवाडा, चांदोरी, खैरलांजी, अर्जुनी, सावरा, पिपरिया आणि डब्बे टोला.

लोकप्रतिनिधींचे मानले आभार

या ऐतिहासिक निर्णयामुळे वर्षानुवर्षे सिंचनापासून वंचित असलेल्या गावांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. डॉ. योगेंद्र भगत यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आमदार विजय रहांगडाले यांची भेट घेऊन त्यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानले. यावेळी करटीचे सरपंच महेश पटले, चांदोरीचे माजी सरपंच अल्केश मिश्रा, राष्ट्रवादी किसान आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष किशोर पारधी आणि मोरेश्वर ठाकरे प्रामुख्याने उपस्थित होते.ही योजना पूर्णत्वास गेल्यानंतर परिसरातील हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असून कृषी उत्पादनात मोठी वाढ होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# खासगी संस्थेमार्फत जि.प. शाळेत संस्कार शिक्षक नियुक्तीचे आदेश,भरती संशयाच्या भोवऱ्यात



**गोंदिया :–** जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये एका खासगी संस्थेमार्फत सुमारे ५०० मसंस्कार शिक्षकफनियुक्त करण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेबाबत जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे कोणतीही अधिकृत माहिती नाही. त्यामुळे या नियुक्त्यांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुरुवातीला तोंडी तक्रार होती. परंतु आता लेखी तक्रार शिक्षण विभागाला प्राप्त झाल्याने त्या संबंधित संस्थेकडून स्पष्टीकरण मागितले आहे. सम ाधानकारक स्पष्टीकरण न दिल्यास सोमवारनंतर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया करण्यात येईल, असे प्राथमिक शिक्षणाधिकारी पवन खंदारे यांनी सांगितले.

गोंदिया जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत जिल्हा परिषद सदस्यांनी हा मुद्दा उचलून धरला. गोरगरिबांच्या मुलांची नोकरीच्या नावावर आर्थिक पिळवणूक करून बोगस नियुक्तिपत्र देण्यात आले. त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी सभेत करण्यात आली.

मागील वर्षभरापासून संबंधित खासगी संस्थेमार्फत जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये मसंस्कार शिक्षकफ म्हणून स्वयंसेवक पाठविण्यात येत आहेत. या स्वयंसेवकांना दररोज शाळेत उपस्थित राहून सुमारे दोन तास अध्यापन करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे सांगितले जाते. तसेच, उपस्थितीच्या करीत असल्याचे सांगितले जाते. या नियुक्ती प्रक्रियेसाठी उमेदवारांकडून ४० हजार ते ६५ हजार रुपये घेतल्याचा आरोपही काही उमेदवारांनी केला आहे.

या आरोपांची अधिकृत दुजोरा हळूहळू मिळत आहे. शैक्षणिक सत्र २०२६–२७साठी निवड झालेल्या स्वयंसेवकांना नियुक्तिपत्र देण्यात आले. त्यामध्ये १८ ऑगस्ट २०२६ पासून संबंधित शाळांवर हजर राहण्याचे निर्देश असून १८ ते २६ ऑगस्टदरम्यान रुजू अहवाल ई–मेलद्वारे सादर करण्यास सांगितले आहे. नियुक्तिपत्रानुसार, संबंधित शिक्षकांना दरमहा ९,२४० रुपये मानधन देण्यात येणार असल्याचा उल्लेख आहे.

## वाघाच्या हल्ल्यात मृत महिलेच्या कुटुंबीयांना १० लाखांची मदत; आमदार राजकुमार बडोले यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द




**अर्जुनी–मोरगाव:–** तालुक्यातील मौजा वडेगाव बंध्या येथील वाघाच्या दुर्दैवी हल्ल्यात प्राण गमावलेल्या महिलेच्या कुटुंबीयांना शासनाकडून मंजूर झालेली १० लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली. अर्जुनी–मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजकुमार बडोले यांच्या हस्ते हा मदतीचा धनादेश पीडित कुटुंबाला प्रदान करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, १० मे २०२६ रोजी वडेगाव बंध्या येथील रहिवासी सौ. शोभा हरिदास रहाटे यांचा जंगल परिसरात सरपण गोळा करण्यासाठी गेल्या असताना वाघाच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून शासनाकडून पीडित कुटुंबासाठी तत्काळ १० लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली होती.त्या अनुषंगाने २५ जुलै २०२६ रोजी आयोजित एका विशेष कार्यक्रमात मंजूर झालेला १०,००,००० रुपये (अक्षरी दहा लाख रुपये) रकमेचा धनादेश मृत महिलेचे पती हरिदास रहाटे यांच्याकडे आमदार राजकुमार बडोले यांच्या हस्ते सन्मानपूर्वक सोपवण्यात आला.

याप्रसंगी बोलताना आमदार राजकुमार बडोले यांनी रहाटे कुटुंबीयांचे सांत्वन केले. ङ्गही घटना अतिशय वेदनादायी असून शासन या कठीण प्रसंगात पीडित कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात प्राण गमावलेल्या अथवा बाधित झालेल्या कुटुंबांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे,ङ्ग असे ते म्हणाले.तसेच, जंगलालगतच्या भागातील नागरिकांमध्ये जनजागृती करून अशा दुर्घटना पुन्हा घडणार नाहीत यासाठी वन विभागाने योग्य उपाययोजना व खबरदारी घेण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

धनादेश वितरणाच्या या कार्यक्रमाला गोठणगावचे वनपरिक्षेत्राधिकारी मिलिंद पवार, वन विभागाचे अन्य अधिकारी व कर्मचारी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच वडेगाव बंध्या व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दरेकसा आरोग्य केंद्रांतर्गत हिवताप फोफावला

**सालेकसा:–** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र दरेकसा अंतर्गत येणाऱ्या परिसरात मलेरियाने (हिवताप) थैमान घातले आहे. आतापर्यंत या भागातील तब्बल २५ नागरिकांना मलेरियाचे संक्रमण झाले आहे. त्यापैकी चौघांची प्रकृती गंभीर बनल्याने तिघांवर सालेकसा ग्रामीण रुग्णालयात, तर एका रुग्णावर गोंदियाच्या केटीएस रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# शहरातील वीज अनब कचऱ्याच्या समस्येवर गाजली नगर परिषदेची सर्वसाधारण सभा

**गोंदिया :–** नगर परिषदेची दुसरी सर्वसाधारण सभा शुक्रवारी नगराध्यक्ष सचिन शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत ४३ विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन, शिक्षण, वीजपुरवठा, बांधकाम तसेच स्वच्छता या विषयांवर चर्चा झाली. शहरातील वीजशपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने वीज ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. तर पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने शहरातील केरकचऱ्याची नियमित विल्हेवाट लावली जात नसल्याचा मुद्दा काही नगरसेविकांनी सभेत उपस्थित केला.

नगरसेवक अभय अग्रवाल, राज शुक्ला यांनी शहरातील मोकाट श्वानांच्या वाढत्या उपद्रवाचा मुद्दा उपस्थित करत नागरिकांवर होणाऱ्या हल्ल्यांबाबत चिंता व्यक्त केली. मोकाट श्वानांच्या नसबंदी आणि इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी त्यांनी केली. यास सभागृहातील सर्व सदस्यांनी पाठिंबा दिला. नगर परिषदेचे मुख्याधिकारी संदीप बोरकर यांनीही तातडीने आवश्यक कारवाई करण्याचे आश्वासन दिले. मारवाडी शैक्षणिक संस्थेने नगर परिषदेच्या इंजिन




शेड शाळेची पडीक इमारत दत्तक घेण्यासंदर्भात केलेल्या विनंतीवरही चर्चा झाली. घनश्याम पानतावणे यांनी शासनाच्या दत्तक शाळा योजनेचा संदर्भदेत, सामाजिक हितासाठी प्रतिष्ठित संस्थेला शाळा दत्तक देण्यास हरकत नसल्याचे मत व्यक्त केले. नगरसेवक राकेश ठाकूर, अजय अग्रवाल, क्रांती जयस्वाल, अमर रंगारी आणि सुनील भराणे यांनीही या निर्णयाचे स्वागत केले. सभेत शहरातील स्वच्छता व्यवस्थेवरही तीव्र चर्चा झाली. बसपा नगरसेविका स्नेहा गडपायले यांनी शहरातील स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनातील त्रुटींकडे लक्ष वेधले. स्वच्छतेची जबाबदारी असलेल्या मजय अंबेफ संस्थेचा करार संपल्यानंतरही त्याच संस्थेकडून काम सुरू असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

### चौकशी करून कारवाई करणार

**नगरसेवकांनी मजय अंबेफ संस्थेच्या कामकाजात अनियमितता असल्याचा आरोप करत अनेक भागांत नियमित कचरा उचलला जात नसल्यामुळे कचऱ्याचे ढीग साचत असल्याची तक्रार केली. तसेच महिला कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावर नगर परिषदेचे उपाध्यक्ष संतोष पाटले यांनी तातडीने चौकशी करून आवश्यक कारवाई केली असे त्यांनी सांगितले.**

# गोंदियात कर्जमुक्ती योजनेला वेग : पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण प्रमाणपत्रांचे वितरण



**गोंदिया :–** राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी ङ्गपुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६ङ्ग अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील पात्र सभासद शेतकऱ्यांना आज मोठा दिलासा मिळाला. सेंट्रल कृषक सेवा सहकारी संस्था, कटंगी कला, ता. गोंदिया येथे जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या विशेष मेळाव्यात पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला गोंदिया जिल्ह्याचे खासदार राजेंद्र जैन,जिल्हा मध्यवर्ती बँकेचे सरव्यवस्थापक सुरेश टेटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी उपनिबंधक सहकारी संस्था योगेश भाकरे यांनी योजनांची संपूर्ण माहिती दिली. त्यांच्या हस्ते शेतकऱ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी संबंधित योजनेच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.मेळाव्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी प्रक्रियेसाठी आधार प्रमाणीकरणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच उर्वरित पात्र शेतकऱ्यांनी लवकरात लवकर प्रमाणीकरण प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले.या उपक्रमामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्यास गती मिळणार असून, प्रशासनाच्या या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

यावेळी सर्वश्री प्रेमकुमार रहांगडाले, राजलक्ष्मी तुरकर, केतन तुरकर, पूजा अखिलेश सेठ, बाळकृष्ण पटले, बाबा पगरवार, सरला चिखलोंडे, मोहिनी वराडे, अखिलेश ठाकूर, अखिलेश सेठ, कीर्ती पटले, सदाशिव वाघाडे, गणेश लांजेवार, लिकेश चिखलोंडे, भाऊलाल रहांगडाले, मदन चिखलोंडे, रमेश गौतम, मंगल ठाकरे, केवल रहांगडाले, दिनेश तुरकर, सुनील पटले, शैलेश वासनिक सहित शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अभा साहित्य परिषदेच्या माध्यमातून साहित्यिकांनी पुढे यावे : देशमुख



**गोंदिया :–** गोंदिया जिल्ह्यात विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे कलावंत आणि साहित्यिक मोठ्या संख्येने आहेत. या गुणी साहित्यिकांनी आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून मनातील भावना आणि विचार लिखित स्वरूपात मांडले पाहिजेत. त्यासाठी मअखिल भारतीय साहित्य परिषदफ हे एक सशक्त वैचारिक व्यासपीठ उपलब्ध झाले असून, जिल्ह्यातील साहित्यिकांनी याचा पुरेपूर लाभ घेऊन साहित्य क्षेत्रात पुढाकारघ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ मार्गदर्शक अनिल देशमुख यांनी केले, गोंदिया जिल्ह्यात

प्रथमच अखिल भारतीय साहित्य परिषदेच्या सदस्यांची विशेष सभा पार पडली. या सभेत मार्गदर्शन करताना देशमुख बोलत होते. सभा विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित संचालक ॲड. लखनसिंह कटरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हा समन्वयक दुलीचंदराव बुद्धे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. या सभेत अखिल भारतीय साहित्य परिषद मसाहित्य–भारतीफ गोंदिया जिल्ह्याची नविन कार्यकारिणी सर्वानुमते घोषित करण्यात आली. कार्यकारिणीत अध्यक्षपदी दुलीचंदराव बुद्धे, कार्याध्यक्ष अनूप शुक्ला, उपाध्यक्ष

योगेश पारधी व डॉ. इंद्रकला बोपचे, महामंत्री इंजि. सूर्यप्रकाश पारधी, सहमंत्री प्रा. पवन कटरे व लीलाधर पाथोडे, कोषाध्यक्ष व कार्यालय प्रमुख पुरुषोत्तम श्रीत आहे. मेंढे, प्रचार व प्रसार (समाज माध्यम) चांडोराव बिसेन व पवन पाथोडे यांची निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे या नूतन कार्यकारिणीत सदस्य म्हणून दिलीपराव देशमुख, तिलक पटले, सौ. धनिषाताई कटरे, सौ. लताताई बाजपेयी, सौ. भावनाताई कदम, सौ. सुषमा यदुवंशी, सौ. ज्योत्स्नाताई कोरे आणि कु. शिला तिवारी यांचा समावेश करण्यात आला. तसेच मार्गदर्शक म्हणून वरिष्ठ साहित्यिक अनिल देशमुख, प्रभाकर वराडे, इंजि गोवर्धन बिसेन आणि प्रा. सुनील भजे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सभेचे संचालन लीलाधर पाथोडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रचार प्रमुख प्रा. चांडोराव बिसेन यांनी मानले. या नूतन कार्यकारिणीमुळे गोंदिया जिल्ह्यातील साहित्यिक चळवळीला मोठी गती मिळेल, असा विश्वास या वेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

# कोनसरीत ८३ विद्यार्थ्यांच्या हाती पाठ्यपुस्तके



**चामोर्शी :–** लॉइड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड आणि लॉइड्स इन्फिनिट फ ाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या शालेय साहाय्यता कार्यक्रमांतर्गत जि.प. हायस्कूल कोनसरी येथे २४ जुलै रोजी मोफत शालेय पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत इयत्ता ९ वी, १० वी, ११ वी आणि १२ वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या एकूण ८३ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळावे, शिक्षणाला बळकटी देणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद हायस्कूल, कोनसरीचे मुख्याध्यापक कोहाडे होते. प्रमुख अतिथी म्हणून लॉइड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे प्रशासन विभागप्रमुख बेणुगोपाल यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि उज्वल भविष्यासाठी कठोर परिश्रमाची गरज याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच लॉइड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (सीएसआर) विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंतिम मुदत ३१ जुलै

**गोंदिया :–** जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेडमार्फत प्रभावीपणे सुरू असून खरीप हंगामातील भात पिकासाठी शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारी ही योजना ठरत आहे. जिल्ह्यात आतापर्यंत तब्बल ४४,५८२ शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदविला आहे.

यावर्षी खरीप भात पिकासाठी शेतकऱ्यांना केवळ रु. ६० प्रति हेक्टर इतका अत्यल्प विमा हप्ता भरावा लागणार असून, त्याबदल्यात रु. ६०,००० पर्यंत विमा संरक्षण मिळणार आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकाच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळणार आहे.

दरम्यान, ३१ जुलै २०२६ ही या योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत असल्याने उर्वरित शेतकऱ्यांनी तातडीने पुढाकार घेणे आवश्यक आहे. यंदाच्या हंगामात एल निनोच्या पार्श्वभूमीवर पावसाच्या अनियमिततेचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, संभाव्य नुकसान टाळण्यासाठी विमा संरक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

# पुतळ्यांचा गुदमरतोय श्वास

### जिल्ह्यात ११२१ पुतळे

**महापुरूषांच्या कार्यातून प्रेरणा घेण्यासाठी जिल्ह्यात ११२१ पुतळे उभारण्यात आले. यात महात्मा गांधी यांचे ३६ पुतळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ४३०, गौतम बुध्द ३९८, छत्रपती शिवाजी महाराज १८, पंडीत जवाहरलाल नेहरू ८, इंदिरा गांधी ९, महात्मा ज्योतिबा फुले ४२, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ३१, सावित्रीबाई फुले १३, राणी दुर्गावती १४, संत रविदास २५, भारत माता २, बिरसामुंडा ३८, म नाहेरभाई पटेल २, जमनालाल बजाज १, रमाबाई आंबेडकर १, राजेंद्र प्रसाद २, सुभाषचंद्र बोस ३. झाशीची राणी १ व इतर महापुरूषांचे पुतळे आहेत**

**गोंदिया:–** शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांची ही स्थिती विदारक आहे. नगरपरिषदेलाच नव्हे तर संपूर्ण शहरवासीयांसाठी ही लाजीरवाणी बाब असली तरी त्याचे कोणालाच काही सोयरसुतक नसल्याचे गोंदियातील पुतळ्यांच्या स्थितीवरून स्पष्ट होत आहे. महापुरुषांचे आदर्श डोळ्यापुढे ठेवून त्यांच्या कार्याची प्रेरणा घेण्यासाठी पुतळे चौका–चौकात उभारले जातात. मात्र, त्या पुतळ्यांच्या संरक्षणासाठी शहरात नगरपरिषद किंवा गावात ग्राम पंचायत धजावतही नाही. गोंदिया शहरात महापुरूषांच्या पुतळ्यांची संख्या खूप जास्त नाही. मात्र, या मोजक्या पुतळ्यांचीही देखभाल नगर परिषदेला करणे शक्य होत नाही. पुतळ्यांचे महात्म्य योग्यरितीने जपले जात नसल्यामुळे बेवारस कुत्री पुतळ्याभोवती तिथे जाऊन अभिषेक करतात. चिमण्या, कावळे पुतळ्यांना मुलामा चढविण्याचे काम करताना दिसतात. शहराच्या मध्यभागी भर बाजारात असलेल्या पुतळ्याचे हाल तर आणखीच बेकार आहेत. जमनालाल बजाज पुतळ्यासमोर व्यापारी वर्गाकडून कचरा टाकला जातो. नंतर त्याच ठिकाणी तो पोटविला जातो. फुटपाथवर बसणारे ठेलेवाले सायंकाळी याच पुतळ्याजवळ कचरा टाकून निघून जातात. पुतळ्याभोवतीची जागा तर जणू चारचाकी वाहनांसाठी हक्काचे पार्किंगस्थळ झाले आहे. कोणीही यावे आणि गाडी लावून जावे, अशी स्थिती आहे. नेहरू पुतळ्याची स्थिती काहीशी अशीच आहे. या पुतळ्यासमोर हातठेलेवाले आपल्या गाड्या लावून बसलेले असतात. या पुतळ्याच्या कठड्यात असलेला कचरा नगरपरिषदेने मागील अनेक दिवसांपासून काढलेला नाही.

महात्मा गांधींच्या पुतळ्याचा चबुतरा तर सर्वांसाठी कोणतेही शुभेच्छा फलक लावण्याचे हक्काचे ठिकाण झाले आहे. वर्षातील काही दिवसच हा पुतळा मोकळा श्वास घेतो. अन्यथा नेहमी हा पुतळ्या विविध फलकांनी झाकोळलेला असतो. या पुतळ्याभोवतीही आता छोट्या व्यावसायिकांकडून ठाण



मांडले जात आहे. विशेष म्हणजे, स्वच्छतेचा जागर करणाऱ्या या महापुरूषाच्या पुतळ्याभोवती मात्र अनेक वेळा कचऱ्याचा ढिग साचलेला असतो तर कधी मोकाट जनावरांचे ठाण असते. त्यामुळे हा पुतळा आपल्याच दुर्दशेवर अश्रू ढाळण्यापलिकडे काहीही करू शकत नाही. महाराष्ट्र शासनाने सन २००७ मध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम अंमलात आणली. त्या मोहीमेंतर्गत गठित करण्यात आलेल्या समित्यांनी आपल्या गावातील पुतळ्यांच्या संरक्षणाची जबाबदारी तीन वर्षापूर्वी स्वीकारली होती. त्यामुळे ग्राम पंचायतने पुतळ्यांचे जतन केले किंवा नाही तरी त्या पुतळ्यांकडे दुर्लक्ष होत नव्हते. परंतु शहराच्या ठिकाणच्या पुतळ्यांच्या संरक्षणाची जबाबदारी नगर परिषदेवर आहे. तरीही न.प. याकडे दुर्लक्ष करते.

# ३०० कोटी रुपयांच्या उपसा सिंचन योजनेला मंजुरी

**तिरोडा :–** तालुक्यातील धापेवाडा उपसा सिंचन योजना धरणावर जॅकवेल तयार करून सदर पाणीउपसा करून करटी गावाजवळ खैरबंदा जलाशयातून १८ कि.मी.वर सोडण्यात येणार आहे. यासाठी १८ कि.मी. वर वितरण कुंड तयार करून खैरबंदा जलाशयाच्या माध्यमातून वितरण व्यवस्था हयातीत असलेल्या कालव्याच्या माध्यमातून १२ गावांना शेतीच्या सिंचनाकरिता पाणी दिले जाणार आहे. यासाठीच्या ३०० कोटी रुपयांच्या उपसा सिंचन योजनेला यांच्या आ. विजय रहांगडाले पाठपुराव्यानंतर शासनाने मंजुरी दिली आहे. यामुळे तालुक्यातील सिंचन क्षमतेत वाढ होऊन शेतकऱ्यांना मदत होणार आहे. खैरबंधा डाव्या कालव्याच्या टेल भागातील गावांना सिंचनाकरिता १२ ग्रामपंचायत कार्यालयांनी आ. विजय रहांगडाले यांच्याकडे केली होती. त्याची दखल घेत त्यांनी शासनाकडे पाठपुरावा केला. धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा–२अंतर्गत खैरबंधा तलावाच्या टेलवरील भागातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी देण्याकरिता उपसा सिंचन योजनेच्या कामाचे सर्वेक्षण करण्याचे काम समाविष्ट करण्यात आले. त्या अनुषंगाने सविस्तर सर्वेक्षण करण्याचे काम करण्यात आले. धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा २अंतर्गत ९०,१४६ हेक्टर सिंचन क्षमता प्रस्तावित करण्यात आली होती. त्याकरिता



खैरबंधा मध्यम प्रकल्पाच्या शेवटच्या भागातील गावांना पाणी मिळण्याकरिता धापेवाडा उपसा सिंचन योजना धरणावर जॅकवेल तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे बोरा, परसवाडा, बघोली, अर्जुनी, सावरा, पिपरिया, चांदोरी, खैरलांजी, बिहरीया, इंदोरा बु, करटी बु, करटी खुर्द या गार्वाना याचा लाभ होणार आहे. उपसा सिंचन योजनेद्वारा सिंचनाकरिता खरीप व रब्बी हंगामाकरिता पाणी देण्यात येणार असून, या योजनेतून कालव्याचे सिमेंटीकरण, नूतनीकरणाची कामे होणार आहेत. या कामाकरिता ३०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचे आभार मानले असून, या कामामुळे २०१६ हेक्टर शेती ही सिंचनाखाली येणार आहे.